जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एल्गार

सामूहिक रजा टाकून शिक्षक रस्त्यावर; टीईटी, पदोन्नती, संचमान्यता व बीएलओ सक्तीविरोधात धरणे; अन्यायकारक धोरणे तातडीने मागे घेण्याची मागणी, 'शिक्षकांना अध्यापन करू द्या, अशैक्षणिक कामातून मुक्त करा'



नगर – कार्यरत शिक्षकांवर लादण्यात आलेली टीईटीची अनिवार्यता, पदोन्नती प्रक्रियेतील अन्यायकारक अटी, संचमान्यतेचे जाचक धोरण, बीएलओच्या अशैक्षणिक कामाची सक्ती तसेच इतर शिक्षकविरोधी निर्णयांविरोधात अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनासाठी जिल्ह्यातील शिक्षकांनी सामूहिक रजा टाकून सहभाग नोंदवत शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी कार्यालया समोर करण्यात आलेल्या आंदोलनाने संपूर्ण परिसर शिक्षक, शिक्षकेतरांच्या घोषणांनी दणाणला. या आंदोलनास राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. आंदोलनात समन्वय समितीचे अध्यक्ष सुनिल पंडित, सचिव आप्पासाहेब शिंदे, शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, बबन गाडेकर, दत्तात्रय कुलट, प्रकाश नांगरे, संतोष दुसुंगे, नारायण पिसे, ज्ञानदेव बेरड, सचिन झगडे, अमोल ठाणगे, प्रसाद शिंदे, मनिषा वाकचौरे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विलास पेद्राम आदींसह शिक्षक सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलकांनी राज्य शासनाच्या शिक्षणविषयक धोरणांमुळे शिक्षकांचे मानसिक, शारीरिक आणि व्यावसायिक खच्चीकरण होत असल्याचा आरोप केला. शासन सातत्याने शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करत असून, वारंवार लोकशाही मार्गाने निवेदने, बैठका आणि पाठपुरावा करूनही कोणताही सकारात्मक निर्णय घेतला जात नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदवला.

समन्वय समितीच्या निवेदनात नमूद करण्यात आले की, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या सेवेशी संबंधित अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. शासनाचे अलीकडील निर्णय शिक्षकांसाठी अत्यंत जाचक ठरत असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवरही होत आहे. १४ मे २०२६ रोजी शिक्षण संचालनालयाने विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया सुरू करण्याबाबत काढलेले पत्र तातडीने रद्द करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. या पत्राच्या आधारे ज्या जिल्ह्यांमध्ये पदोन्नती प्रक्रिया पार पडली असेल तीही रद्द करून नव्याने न्याय्य निकषांवर प्रक्रिया राबवावी, अशी भूमिका शिक्षकांनी मांडली.

सन २०१० पूर्वी सेवेत रुजू झालेल्या आणि अनेक वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्याची सक्ती अन्यायकारक असल्याचे आंदोलकांनी सांगितले. तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि तेलंगणा राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही कार्यरत सेवाज्येष्ठ शिक्षकांना टीईटी नियमांत शिथिलता द्यावी किंवा त्यांच्यासाठी स्वतंत्र टीईटी परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाने पात्रता पूर्ण करण्यासाठी दिलेल्या मुदतीच्या अधीन राहून सेवाज्येष्ठ व पात्र शिक्षकांना पदोन्नतीची संधी उपलब्ध करून द्यावी. १९ जानेवारी २०२६ रोजी शालेय शिक्षण विभागाने काढलेले पत्र रद्द करून नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार पदोन्नतीचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

१५ मार्च २०२४ रोजी लागू करण्यात आलेले संचमान्यता धोरण हे शिक्षण हक्क कायदा (आरटीई) तसेच १९८० च्या मूळ धोरणाशी विसंगत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या धोरणामुळे प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता निर्माण होणार असून ग्रामीण भागातील शाळांचे अस्तित्व धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. त्यामुळे हा अन्यायकारक जीआर तातडीने रद्द करण्याची मागणी करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इतर शासकीय कर्मचारी उपलब्ध नसतील तरच शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती करावी. मात्र प्रत्यक्षात केवळ प्राथमिक शिक्षकांनाच मोठ्या प्रमाणात बीएलओची जबाबदारी दिली जात असल्याने त्यांच्या अध्यापनावर परिणाम होत आहे. त्यामुळे शिक्षकांना अशैक्षणिक कामातून पूर्णपणे मुक्त करून बीएलओसाठी इतर शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

शिक्षकांवर दिवसेंदिवस वाढत असलेल्या ऑनलाईन कामामुळे अध्यापनासाठी वेळ मिळत नसल्याची तक्रारही आंदोलनादरम्यान करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांना वर्गात अधिक वेळ देता यावा, यासाठी ऑनलाईन अहवाल, माहिती भरणे आणि इतर प्रशासकीय कामांचा भार कमी करावा, अशी मागणी करण्यात आली. शासनाने टीईटी, पदोन्नती, संचमान्यता, बीएलओची सक्ती, ऑनलाईन कामाचा वाढता भार यासह सर्व न्याय्य मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

# चालकाला डुलकी लागल्याने खासगी बस झाली पलटी

**४० प्रवासी बालंबाल बचावले, वाळुंज बायपास रस्त्यावरील घटना**

नगर – परभणीवरून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या खासगी बसला वाळुंज (ता. नगर) शिवारातील बायपास रस्त्यावर ८ जुलै रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास अपघात झाला. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस पलटी झाली. या बसमध्ये सुमारे ४० प्रवाशी असल्याची माहिती समोर आली आहे. यातील चौघे किरकोळ जखमी झाल्याचे नगर तालुका पोलिसांनी सांगितले.

यामध्ये संतोष बाळासाहेब लोखंडे (रा. पुणे), ज्ञानेश्वर किसनराव शेळके (रा. हिंगोली), रवी जगन्नाथ गुळगुळे (रा. हिंगोली) व लक्ष्मण लिंबाजी काकडे (रा. परभणी) अशी जखमींची नावे आहेत. यासंदर्भात नगर तालुका पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. परभणीवरून पुण्याच्या दिशेने प्रवाशी घेऊन निघालेल्या चालकाला वाळुंज ते अरणगाव बायपास शिवारात डुलकी लागल्याने बसचा अपघात झाला व बस पलटी झाली. प्रवाशांनी आरडाओरडा केला. यावेळी स्थानिकांनी मदत करून प्रवाशांना बसच्या बाहेर काढले व रुग्णालयात दाखल केले. चार प्रवाशी किरकोळ जखमी झाले असून जीवितहानी झाली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

# माळीवाडा वेस परिसरात बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीचा मृत्यू

नगर – शहरातील माळीवाडा वेस येथील कपिलेश्वर पानटपरीजवळ एक अंदाजे ४० वर्षांचा अनोळखी पुरुष बेशुद्ध आणि बेवारस अवस्थेत आढळून आला होता. उपचारासाठी त्याला जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ८ जुलै रोजी सकाळी ११.५० वाजण्याच्या सुमारास माळीवाडा वेस परिसरातील कपिलेश्वर पानटपरीजवळ एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत पडलेली नागरिकांना दिसून आली. यानंतर खाजगी रुग्णवाहिका चालक अक्षय पाचरणे यांनी तत्परता दाखवत सदर अनोळखी व्यक्तीला तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, हॉस्पिटलचे मेडिकल ऑफिसर डॉ. चोपडे यांनी तपासणी अंती त्या व्यक्तीला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची माहिती कोतवाली पोलिसांना दिली. सध्या या मृत व्यक्तीची ओळख पटलेली नसून त्याचे वय अंदाजे ४० वर्षे आहे. त्याच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# रात्रीच्या वेळी संशयास्पदरित्या फिरणारा तरुण गजाआड

नगर – शहरातील अमरधाम परिसरात अंधाराचा फायदा घेऊन संशयास्पद रित्या वावरणाऱ्या एका २२ वर्षीय तरुणाला कोतवाली पोलिसांनी पकडले आहे. अनिकेत अजय चक्रनारायण (वय २२, रा. साईराजनगर, गजानन कॉलनी, नागापूर) असे अटक करण्यात आलेल्या संशयित तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोतवाली पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे पोलीस कर्मचारी ७ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास अहिल्यानगर शहरात 'ब्लॅक स्पॉट पेट्रोलिंग' (रात्रीची गस्त) करत होते. रात्री ११:४५ वाजण्याच्या सुमारास अमरधामच्या आतमध्ये, भिंतीच्या आडोशाला एक इसम तोंडाला रुमाल बांधून अंधारात संशयास्पद रित्या फिरताना पोलिसांना दिसून आला. पोलिसांचे वाहन पाहताच त्याने अंधाराचा फायदा घेऊन पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखून गस्त घालणाऱ्या पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करून त्याला जागीच पकडले.

पोलीस पथकाने त्याची कसून चौकशी केली असता, त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देऊन खरी माहिती देण्यास टाळाटाळ केली. रात्रीच्या वेळी स्वतःची ओळख लपवून एखादा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने तो तिथे थांबला असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

या प्रकरणी पो. कॉ. दत्तात्रय कोतकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी अनिकेत चक्रनारायण याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस हवालदार विनोद बोरगे या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

# नवनागापूर परिसरातून आयफोनची चोरी

नगर – एमआयडीसी परिसरातील नवनागापूर भागातील सह्याद्री चौकातून एका ज्येष्ठ व्यावसायिकाचा महागडा मोबाईल आयफोन चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात चोरट्याने शर्टच्या खिशातून ४५ हजार रुपये किमतीचा आयफोन लंपास केला असून याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जालिंदर आप्पासाहेब तनपुरे (वय ६४, रा. मंगल हौसिंग सोसायटी, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना २७ जून रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास सह्याद्री चौक, नवनागापूर येथे घडली. फिर्यादी जालिंदर तनपुरे हे सह्याद्री चौकात आले असता, अज्ञात चोरट्याने त्यांच्या शर्टच्या वरच्या खिशात ठेवलेला आयफोन १४ प्लस हा मोबाईल फोन चोरून नेला. मोबाईल चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी सर्वत्र शोध घेत ८ जुलै रोजी सायंकाळी पोलिसांत फिर्याद दिली.या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कायदा कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# एमआयडीसीच्या कंपनीत कर्मचाऱ्याची आत्महत्या

**प्लांट हेडसह ४ वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल**

नगर – एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात कंपनीच्या प्लांट हेडसह चार वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन आदिनाथ भदाने (वय ४६) असे आत्महत्या केलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.

याप्रकरणी मृताची पत्नी कल्पना सचिन भदाने (वय ४६, रा. सावेडी, अहिल्यानगर, मूळ रा. घोगरगाव, ता. श्रीगोंदा) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ८ जुलै रोजी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून समीर शेवाळे, पुरुषोत्तम त्र्यंबकी (प्लांट हेड), बाबासाहेब निर्मळ (सेक्रेटरी) आणि विठ्ठल हांडोरे (उपाध्यक्ष) व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध बी.एन.एस. कलम १०८, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना जी.के.एन. सेंटर प्रा. लि. सी. १८ एमआयडीसी (अहिल्यानगर) या कंपनीमध्ये ६ जून सायंकाळी ७ वाजेपासून ते ७ जून रोजीच्या मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास घडली.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, आरोपी समीर शेवाळे, प्लांट हेड पुरुषोत्तम त्र्यंबकी, सेक्रेटरी बाबासाहेब निर्मळ आणि उपाध्यक्ष विठ्ठल हांडोरे तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सचिन भदाने यांना वेळोवेळी अपमानास्पद वागणूक दिली. तसेच त्यांना तीव्र मानसिक आणि शारीरिक त्रास देऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. या सततच्या जाचाला कंटाळून अखेर सचिन भदाने यांनी टोकाचे पाऊल उचलले.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे करत आहेत. गुन्हा दाखल झाल्यावर यातील आरोपी समीर शेवाळे, प्लांट हेड पुरुषोत्तम त्र्यंबकी, सेक्रेटरी बाबासाहेब निर्मळ या ३ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# जिल्हा बँकेच्या ठरावाला जाण्यापासून रोखण्यासाठी सोसायटीच्या २ संचालकांचे अपहरण

**पाच जणांवर गुन्हा दाखल**

नगर – पारनेर तालुक्यातील पाडळी रांजणगाव येथील जय हनुमान विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक असलेल्या दोन ज्येष्ठ व्यक्तींचे गावातीलच विरोधी गटातील लोकांनी अपहरण केल्याची घटना घडली आहे. जिल्हा बँकेच्या आगामी ठरावाला या संचालकांनी उपस्थित राहू नये, याच राजकीय उद्देशाने हे अपहरण करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत किरण सुदाम साठे (वय ४०, रा. पाडळी रांजणगाव, ता. पारनेर) यांनी सुपा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गणेश एकनाथ करंजुले, दीपक अशोक करंजुले, गोरख नारायण उबाळे, अजित भाऊसाहेब उबाळे आणि प्रद्युम्न गुलाब करंजुले (सर्व रा. पाडळी रांजणगाव, ता. पारनेर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १३७(२), १४२, १८९(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जय हनुमान विविध कार्यकारी सोसायटी, पाडळी रांजणगाव हिचा जिल्हा बँकेचा ठराव आगामी १० जुलै रोजी होणार आहे. या ठरावासाठी फिर्यादीचे वडील सुदाम आनंदा साठे (वय ७०, संचालक) आणि त्यांच्या गावातील कांतीलाल नामदेव उबाळे (वय ६७, संचालक) हे जिल्हा बँकेच्या ठरावास उपस्थित राहू नयेत, या कारणासाठी गावातील विरोधी गटातील लोकांनी ७ जुलै रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास त्यांचे अपहरण करून त्यांना पळवून नेले.

हा प्रकार लक्षात आल्यानंतर ८ जुलै रोजी दुपारी सुपा पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सुपा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कोठुळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# नगरमध्ये कोयता बाळगणाऱ्या तरुणाला पोलिसांनी पकडले

नगर – शहरातील वाडीया पार्क परिसरात लोखंडी धारदार कोयता बाळगून फिरणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाला कोतवाली पोलिसांनी पकडले आहे. प्रतीक बाळासाहेब पवार (वय २१, रा. गजानन कॉलनी, आनंदनगर, नवनागापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

कोतवाली पोलिसांचे पथक ७ जुलै रोजी रात्री ९ ते ११.१३ वाजेच्या सुमारास वाडीया पार्क परिसरात गस्त घालत होते. यावेळी संशयित आरोपी प्रतीक पवार हा एका विना नंबरच्या राखाडी रंगाच्या क्सेस मोपेड दुचाकीवरून जाताना पोलिसांना आढळला. पोलिसांनी त्याची तपासणी केली असता, त्याच्याकडे लाकडी मूठ असलेला लोखंडी कोयता बेकायदेशीरपणे बाळगलेला मिळून आला. पोलिसांनी कोयता आणि मोपेड दुचाकी असा एकूण ४० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पो. कॉ. महेश पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलम ४/२५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# भाजीविक्रेत्या महिलेचे दागिने लुटणारे वडगाव गुप्ता व विळदचे दोघे जण जेरबंद



नगर – नगर तालुक्यातील देहरे परिसरात भाजीपाला विक्री करून घरी परतणाऱ्या महिलेवर हल्ला करून तिचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन लुटणाऱ्या वडगाव गुप्ता व विळद येथील दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या तीन दिवसांत शोध घेत अटक केली आहे. या कारवाईत गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी व मोबाईल असा एकूण ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी महिला ४ जुलै रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून भाजीपाला विक्री करून उरलेला भाजीपाला घेऊन घरी परतत होती. देहरे शिवारात दोघांनी तिच्या दुचाकीला लाथ मारून तिला अडविले. त्यानंतर बळजबरीने तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल फोन हिसकावून घेतला होता. यासंदर्भात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्यासह पोलीस अंमलदार विष्णू भागवत, दीपक घाटकर, शाहिद शेख, गणेश धोत्रे, फुरकान शेख, प्रशांत राठोड, ज्योती शिंदे यांचे पथक तयार करण्यात आले. पथकाने घटनास्थळी भेट देऊन माहिती संकलित केली तसेच तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला.

तपासादरम्यान राहुल विजय निकम याने गुन्हा केल्याची आणि तो त्याच्या साथीदारासह निंबळक रेल्वे फाटकाजवळील धरमपुरी मंदिर परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे राहुल विजय निकम (वय २५, रा. वडगाव गुप्ता, ता. नगर) व अरुण रावसाहेब बर्डे (वय २१, रा. विळद, ता. नगर) अशी सांगितली. विश्वासात घेऊन केलेल्या चौकशीत दोघांनीही सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

# देहरे येथील डांबर प्लँटवरून हायड्रॉलिक तेल चोरण्याचा प्रयत्न

नगर – नगर तालुक्यातील देहरे येथील एका डांबर प्लँटवरून तब्बल ६० हजार रुपये किमतीचे हायड्रॉलिक तेल चोरण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत फिर्यादी गणेश मुरलीधर चौधरी (वय ५५, रा. समृद्धी अपार्टमेंट, मॉडर्न कॉलनी, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मुस्ताक खुदाबक्ष शेख (वय २९, रा. देहरे, ता. नगर) आणि किरण उर्फ बुट्या भाऊसाहेब जाधव (रा. देहरे, ता. नगर) या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ६२, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देहरे येथील 'मनिषा कन्स्ट्रक्शन कंपनी पुणे' यांच्या मालकीच्या डांबर प्लँटवर ८ जुलै रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. आरोपींनी प्लँटमधील ६०हजार रुपये किमतीचे हायड्रॉलिक तेल चोरण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार लक्षात आल्यानंतर रात्री एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास स.फौ. खेडकर करत आहेत.

# नवनीतदास छप्पनिया यांचे वृद्धपकाळाने निधन



नगर – श्रीकृष्ण बंगला, सहकारनगर, सपकाळ हॉस्पिटल रोड, सावेडी, अहिल्यानगर येथील रहिवासी नवनीतदास विठ्ठलदास छप्पनिया (वय ८५) यांचे ७ जुलै रोजी वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्यावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, भाऊ, भाऊजई, मुली, मुले, जावई, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# महादेव जाधव यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी महादेव पाराजी जाधव (वय ७५) यांचे ८ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. श्री स्वामी समर्थ फरसाणचे प्रकाश व अनिल जाधव यांचे ते वडील होत.

# दोघा सराईत दरोडेखोरांसह चोरीचे सोने विकत घेणारा सोनार गजाआड

**तब्बल १२ गुन्हे आले उघडकीस, आणखी पसार ७ आरोपींचा शोध सुरु**



नगर – पाथर्डी तालुक्यातील किर्तनवाडी येथे जून महिन्यात झालेल्या धाडसी दरोड्याचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उघडकीस आणला असून या प्रकरणातील दोन सराईत दरोडेखोरांसह चोरीचे सोने विकत घेणा- या सोनाराला अटक करण्यात आली आहे. त्यांच्या चौकशीत जबरी चोरी व घरफोडीचे एकूण १२गुन्हे उघडकीस आले आहेत.तर त्यांच्या फरार असलेल्या ७ आरोपींचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

किर्तनवाडी येथे १० जून रोजी पहाटे दीडच्या सुमारास सात जणांनी रावसाहेब बाजीराव किर्तने यांच्या घराचे कुलूप तोडून प्रवेश केला. त्यांच्यासह पत्नीला मारहाण करून १ लाख ६३ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने लंपास केला होता. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गंभीर गुन्ह्याचा तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली. पथकाने घटनास्थळाची पाहणी करून तांत्रिक माहिती, गोपनीय बातमीदार आणि व्यावसायिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध सुरू ठेवला.

दरम्यान, ७ जुलै रोजी माहितीच्या आधारे संशयित आरोपी टाकळी मानूर परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून राम कृष्णा चव्हाण (वय २२, रा. चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड) आणि करण रामनाथ भोसले (वय २०, रा. सारोळा कासार, ता. नगर) या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत या दोघांनी आपल्या इतर साथीदारांसह किर्तनवाडी येथील दरोडा टाकल्याची कबुली दिली. या टोळीत राहुल रज्जाक काळे, आदिशोक चंद्रभान चव्हाण, हनुमान कृष्णा चव्हाण, लक्ष्मण कृष्णा चव्हाण, सागर नाबद चव्हाण, कडुबा ढोणे आणि विकास भोसले यांचा समावेश असल्याचे समोर आले असून ते पसार आहेत.

तपासादरम्यान राम चव्हाण याने चोरीतील सोन्याचे दागिने ओमकार पांडुरंग दहीवाळ (रा. चकलांबा, जि. बीड) याला विकल्याची माहिती दिली. त्याबाबत चौकशी केली असता संबंधिताने समाधानकारक माहिती न दिल्याने त्याला अटक करण्यात आली आहे. आरोपींची कसून चौकशी केली असता त्यांच्या विरोधात शेवगाव व पाथर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जबरी चोरी, घरफोडी व चोरीचे एकूण१२ गुन्हे उघडकीस आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिष भोये, उपनिरीक्षक अनंत सालगुडे तसेच अंमलदार गणेश लोंढे, गणेश धोत्रे, फुरकान शेख, भिमराज खर्से, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, किशोर शिरसाठ, बाळासाहेब गुंजाळ, अमोल आजबे, मनोज साखरे, सागर ससाणे, प्रशांत राठोड, भगवान धुळे यांच्या पथकाने केली.

# गृहिणी

## आरोग्य

### चुकवू नका सकाळचा नाष्टा

सकाळचा नाश्ता हा आपल्या दिवसभरातील सर्वात महत्त्वाचा आहार मानला जातो, कारण रात्रीच्या दीर्घ उपवासानंतर आपल्या शरीराला ऊर्जेची खरी गरज याच वेळी असते. निरोगी राहण्यासाठी उठल्यानंतर साधारण १ ते २ तासांच्या आत, म्हणजेच सकाळी ८ ते ९ या वेळेत भरपेट नाश्ता करणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. नाश्त्यामध्ये केवळ चहा-बिस्कीट किंवा खारी खाणे टाळावे, कारण यामुळे शरीराला आवश्यक पोषण मिळत नाही आणि सिडिटीचा त्रास वाढू शकतो. त्याऐवजी पोहे, उपमा, इडली, डोसा, मोड आलेली कडधान्ये किंवा अंडी यांसारख्या पौष्टिक पदार्थांचा समावेश करावा, जे कार्बोहायड्रेट्स, प्रोटीन्स आणि फायबरने समृद्ध असतात. यासोबतच नाश्त्यामध्ये केळे, सफरचंद किंवा पपई यांसारखी ताजी फळे खाल्ल्यास शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे मिळतात. जे लोक सकाळी नियमितपणे सकस नाश्ता करतात, त्यांच्या शरीरात दिवसभर उत्साह टिकून राहतो, थकवा जाणवत नाही आणि त्यांची पचनक्रियाही उत्तम राहते. याउलट नाश्ता चुकवल्याने दुपारच्या जेवणात जास्त खाल्ले जाते, ज्यामुळे वजन वाढण्याची आणि रक्तातील साखरेचे प्रमाण बिघडण्याची शक्यता असते. म्हणूनच शरीराला नेहमी ताजेतवाने आणि आजारांपासून दूर ठेवण्यासाठी रोज सकाळी राजासारखा भरपेट आणि पौष्टिक नाश्ता करण्याची सवय प्रत्येकाने लावून घेतली पाहिजे.

## पाककला

### चविष्ट वडा पाव

**साहित्य :** पाव ४, बटाटे २ मध्यम उकडलेले, आलं-लसूण पेस्ट १ चमचा, हिरवी मिरची २-३ बारीक चिरलेली, हळद पावडर १/४ चमचा, मोहरी १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, हिंग चिमूटभर, कढीपत्ता ८-१० पाने, कोथिंबीर २ चमचे बारीक चिरलेली, मीठ चवीनुसार, तेल तळण्यासाठी, बेसन १ वाटी, तांदळाचे पीठ १ चमचा, ओवा १/४ चमचा, लाल तिखट १/२ चमचा, पाणी आवश्यकतेनुसार, सुकी लसूण चटणी, हिरवी चटणी

**कृती :** उकडलेले बटाटे कुस्करून घ्या. कढईत १ चमचा तेल गरम करून मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता घाला. त्यात आलं-लसूण पेस्ट, हिरवी मिरची परतून घ्या. हळद, कुस्करलेला बटाटा, मीठ, कोथिंबीर घालून मिश्रण एकजीव करा. थंड झाल्यावर त्याचे मध्यम आकाराचे गोळे करून वडे थापून घ्या. बेसनात तांदळाचे पीठ, ओवा, लाल तिखट, मीठ, चिमूटभर हळद घालून भज्यासाठी लागते तसे पीठ भिजवा. तेल गरम करून वडे बेसनात बुडवून सोनेरी रंगावर तळून घ्या. पाव मधे चिरून तव्यावर बटर लावून हलका शेकवा. पावाला हिरवी चटणी, सुकी लसूण चटणी लावा. मधे गरम वडा ठेवून हलक्या हाताने दाबा. तयार पाव वडा हिरवी चटणी आणि तळलेल्या मिरचीबरोबर गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### घराचे कोपरे

* प्लॉट किंवा घराचा आकार नेहमी चौकोनी किंवा आयतकृती असावा.

* घराचा कोणताही कोपरा कट झालेला (कमी) किंवा वाढलेला नसावा. फक्त ईशान्य कोपरा वाढलेला असेल तर तो चालतो आणि शुभ मानला जातो.

* नैऋत्य किंवा आग्नेय कोपरा वाढला असेल, तर कोर्ट कचेरी, आजारपण किंवा आर्थिक नुकसान सहन करावे लागते. उत्तर/ईशान्य दिशेला: निळा किंवा हलका पिवळा रंग द्यावा.

## सौंदर्य

एक स्टीलचा चमचा फ्रीजमध्ये ५ मिनिटे थंड करा. चेहऱ्याला थोडे बदाम तेल लावून, त्या थंड चमच्याच्या मागच्या भागाने मानेकडून वर गालांकडे आणि डोळ्यांखाली हलका मसाज करा. यामुळे पफिनेस (सुजलेले डोळे/गाल) लगेच कमी होतो आणि 'ब्लड सर्क्युलेशन' वाढते.

## सल्ला

लिंबू जास्त दिवस रसाळ ठेवण्यासाठी त्यांना थोडे खोबरेल तेल चोळा आणि एका डब्यात ठेवून तो डबा फ्रिजमध्ये ठेवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १० जुलै २०२६

**योगिनी (स्मार्त) एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, भरणी १३।१५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** धनलाभ होईल, अडकलेले पैसे परत मिळतील. कौटुंबिक सुख लाभेल.

**वृषभ :** नोकरीमध्ये नवीन अधिकार पद किंवा मोठी जबाबदारी मिळेल.

**मिथुन :** रखडलेली कामे मार्गी लागतील आणि प्रवासाचे योग येतील.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे पूर्ण सहकार्य लाभेल.

**सिंह :** व्यापार-व्यवसायात मोठा आर्थिक नफा होईल आणि मान-सन्मान वाढेल.

**कन्या :** नोकरी बदलू इच्छिणाऱ्यांना नवीन चांगल्या संधी प्राप्त होतील. जुने मित्र भेटतील.

**तूळ :** घर किंवा वाहन खरेदीचे योग जुळून येतील.

**वृश्चिक :** कामाच्या ठिकाणी काही नवीन आव्हाने समोर येतील.

**धनु :** दीर्घकाळापासून प्रलंबित असलेले कायदेशीर प्रश्न तुमच्या बाजूने सुटतील.

**मकर :** कामाचा ताण वाढेल आणि कुटुंबात काही मतभेदाची परिस्थिती निर्माण होईल.

**कुंभ :** नशिबाची पूर्ण साथ लाभेल. नोकरीत बढती किंवा पगारवाढ होईल.

**मीन :** नवीन हितसंबंध जोडले जातील, मात्र आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणावर वाढेल.

## फिल्मीचक्कर क्र. १२४४ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | | ■ | ४ |
| ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | |
| ५ | ■ | ६ | | ७ | | ८ | |
| ९ | | | ■ | | ■ | | ■ |
| ■ | ■ | | ■ | ■ | १० | | ■ |
| ११ | | | | १२ | ■ | १३ | |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| १४ | | ■ | १५ | | ■ | १६ | |

**आडवे शब्द :-** १) एक प्रसिद्ध पार्श्वगायिका ६) अंकुश, प्रतिघात, क्रांतिवीर आदी चित्रपटांचा नायक ९) वह कौन थी ?, एक फूल दो माली, मेरा साया, मेरे मेहबूब आदी चित्रपटांची नायिका १०) .. और काँटे; .. और पत्थर; एक दो माली (चित्रपटांची नावे) ११) राजेश खन्ना, शर्मिला टागोर यांचा एक चित्रपट १३) .. तो तेरे आशिक है सदीयों पुराने चाहे तू माने चाहे ना माने (गाणे) १४) एक दूजे के लिये चित्रपटाची नायिका.. अग्निहोत्री १५) प्रसिद्ध गायिका -- मंगेशकर १६) .. जमाना; .. दौर; .. कदम (चित्रपटांची नावे)

**उभे शब्द :-** २) प्रसिद्ध चित्रपट पार्श्वगायिका मंगेशकर -- मंगेशकर ३) अमिताभ बच्चन, अमजदखान, नितू सिंग यांचा एक गाजलेला चित्रपट ४) अमिताभ बच्चन यांच्या या चित्रपटात सलीम-जावेद यांचे संवाद आहेत ५) .. सावन (चित्रपटाचे नाव) ६) .. करते प्यार तुम्हीसे कर बैठे (गाणे) ७) गंगा तेरा .. अमृत (चित्रपटाचे नाव) ८) एक दूजे के लिये, सनम तेरी कसम आदी चित्रपटांचा नायक ११) देव आनंद, हेमामालिनी यांचा एक चित्रपट १२) ... कोईराला (नेपाळी अभिनेत्री)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** ज्यांच्याकडे संयम राखण्याची ताकद असते, त्यांच्याकडे संपूर्ण जग जिंकण्याची क्षमता असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### काजव्याच्या शरीरातून प्रकाश कसा पडतो?

उन्हाळ्याच्या आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला रात्रीच्या वेळी शेतात, बागेत किंवा झाडांवर चमचमणारे शेकडो काजवे तुम्ही पाहिले असतील. एखाद्या झाडावर तर दिवाळीच लागल्यासारखे वाटते. पण कधी विचार केला आहे का, की काजव्याच्या एवढ्याशा शरीरातून बॅटरी किंवा वीज नसताना हा प्रकाश कसा येतो? विज्ञानात याला 'जीवदीप्ती' म्हणजेच बायोल्युमिनिसेन्स म्हणतात. हा कोणताही चमत्कार नसून निसर्गाने काजव्याला दिलेली एक खास भेट आहे.

सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे काजव्याच्या पोटाच्या खालच्या बाजूला, शेवटच्या २-३ कप्प्यांमध्ये एक खास अवयव असतो. त्याला 'लँटर्न' म्हणतात. या लँटर्नमध्ये दोन मुख्य रसायने तयार होतात. पहिले रसायन म्हणजे लुसिफेरीन. हे प्रकाश निर्माण करणारे इंधन आहे. दुसरे रसायन म्हणजे लुसिफेरेज नावाचे एन्झाईम. हे इंधन पेटवणारी काडी समजा. याशिवाय TP नावाचा ऊर्जेचा स्रोत आणि मॅग्नेशियम देखील लागते. आता ही प्रक्रिया कशी घडते ते पाहू. जेव्हा काजव्याला प्रकाश पाडायचा असतो, तेव्हा तो त्याच्या श्वासनलिकांमधून लँटर्नमध्ये ऑक्सिजन सोडतो. हा ऑक्सिजन, लुसिफेरीन, लुसिफेरेज, TP आणि मॅग्नेशियम एकत्र आले की एक जलद रासायनिक क्रिया घडते.

या क्रियेत लुसिफेरीनचे 'ऑक्सिलुसिफेरीन' मध्ये रूपांतर होते आणि त्यावेळी मोठ्या प्रमाणात ऊर्जा बाहेर पडते. ही ऊर्जा प्रकाशाच्या स्वरूपात दिसते. ही क्रिया इतकी कार्यक्षम असते की जवळपास ९८% ऊर्जेचे रूपांतर प्रकाशात होते आणि फक्त २% उष्णता तयार होते. म्हणूनच काजव्याचा प्रकाश 'थंड प्रकाश' किंवा 'कोल्ड लाईट' म्हणून ओळखला जातो. आपल्या घरातील बल्ब ९०% उष्णता आणि १०% प्रकाश देतो, त्यामुळे तो गरम होतो. पण काजव्याला प्रकाशामुळे काहीच त्रास होत नाही. काजवा त्याच्या मेंदूद्वारे ऑक्सिजनचा पुरवठा नियंत्रित करतो. ऑक्सिजन सोडला की दिवा लागला, थांबवला की दिवा बंद. म्हणूनच काजवे लुक-लुक करतात.

काजवा प्रकाश कशासाठी वापरतो? याची तीन मुख्य कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे जोडीदाराला आकर्षित करणे. नर काजवा विशिष्ट पद्धतीने लुकलुकतो आणि मादी काजवी त्याला त्याच पद्धतीने उत्तर देते. प्रत्येक जातीच्या काजव्याची लुकलुकण्याची पद्धत वेगळी असते. दुसरे कारण म्हणजे संरक्षण. काही काजवे शत्रूला घाबरवण्यासाठी अचानक तेज प्रकाश पाडतात. तिसरे कारण म्हणजे काही मादी काजवे इतर जातीच्या नरांना आपल्याकडे आकर्षित करून त्यांची शिकार करतात.

थोडक्यात, काजव्याचा लुकलुकणारा प्रकाश हा केमिकल, एन्झाईम, ऑक्सिजन आणि ऊर्जा यांच्या अचूक मिश्रणाचा परिणाम आहे. निसर्गाने संवाद साधण्यासाठी, जीव वाचवण्यासाठी आणि पोट भरण्यासाठी काजव्याला दिलेली ही एक अद्भुत यंत्रणा आहे. म्हणूनच काजव्याची रात्र आपल्यासाठी जादुई वाटते.

### विहिरीचे गोड पाणी

एकदा संत गजानन महाराज शेगावजवळील एका गावातील बागेत विश्रांती घेत होते. उन्हाळ्याचे दिवस असल्याने प्रचंड उकाडा होता. महाराजांसोबत असलेल्या भक्तांना आणि स्वतः महाराजांना खूप तहान लागली होती.

त्या बागेचा मालक भास्कर पाटील नावाचा एक श्रीमंत आणि अत्यंत गर्विष्ठ माणूस होता. बागेतच त्याची एक विहीर होती, ज्याला भरपूर पाणी होते. महाराजांचे भक्त भास्कर पाटलाकडे गेले आणि म्हणाले,

आमच्या महाराजांना आणि आम्हाला खूप तहान लागली आहे, कृपया तुमच्या विहिरीचे थोडे पाणी द्याल का?

पण भास्कर पाटलाला आपल्या श्रीमंतीचा आणि बागेचा मोठा गर्व होता. तो गर्वाने म्हणाला, हे कसले महाराज? हे तर मला ढोंगी वाटतात. मी माझ्या विहिरीचे पाणी अशा लोकांना देणार नाही. चालते व्हा इथून! त्याने भक्तांना पाणी देण्यास साफ नकार दिला.

भक्त निराश होऊन महाराजांकडे परत आले आणि त्यांनी घडलेला प्रकार सांगितला. महाराज शांतपणे हसले. त्यांनी बाजूलाच असलेल्या एका जुन्या, कोरड्या आणि पडक्या विहिरीकडे पाहिले. ती विहीर अनेक वर्षांपासून कोरडी होती आणि त्यात फक्त कचरा होता.

महाराजांनी आपल्या एका भक्ताला सांगितले, त्या कोरड्या विहिरीत उतर आणि तिथली थोडी माती बाजूला कर. भक्ताने महाराजांच्या सांगण्यावरून तसे केले. आश्चर्य म्हणजे, भक्ताने माती बाजूला करताच त्या कोरड्या विहिरीतून पाण्याचा मोठा झरा वर आला! पाहता पाहता ती विहीर स्वच्छ आणि गोड पाण्याने तुडुंब भरली. सर्व भक्तांनी पोटभर पाणी प्यायले आणि महाराजांचा जयजयकार केला.

हे जेव्हा भास्कर पाटलाने पाहिले, तेव्हा त्याचे डोळे उघडले. ज्या विहिरीला वर्षानुवर्षे पाणी नव्हते, तिथे महाराजांच्या केवळ इच्छेने पाण्याचा झरा निर्माण झाला होता. त्याला आपल्या चुकीची आणि अहंकाराची तीव्र जाणीव झाली. तो धावत महाराजांकडे आला, त्यांच्या चरणावर पडला आणि रडून माफी मागू लागला. महाराजांनी त्याला शांत केले आणि पदराशी धरले.

बोध : आपल्याकडे कितीही मोठी गोष्ट असली, तरी ती गरजूला वेळेवर देता आली पाहिजे. संपत्तीचा उपयोग माणसाच्या कल्याणासाठी व्हावा, गर्वासाठी नाही.

## आत्मशक्ति



एवढेच नव्हे तर ही गोष्ट त्यांच्या नातेवाईकांनाहीसत्यम्हणून स्वीकारावी लागली. आम्ही आत्म्याच्या अमरत्वाचा अनुभव कसा घेऊ शकतो ? जगातील वेगवेगळ्या धर्मातील जागृत पुरुषांनी आत्मप्रवासाबद्दल जे काही लिहिले आहे. त्यात फार मोठ्या प्रमाणात सारखेपणा दिसून येतो. सर्व धर्मात शरीराच्या मृत्युनंतर आत्मा जीवंत राहतो. निवाड्याच्या प्रक्रीयेतून त्यास जावे लागते, त्याच्या चांगल्या वा वाईट कर्मानुसार, शिक्षा वा लाभ दिले जातात. कर्मानुसार त्याला स्वर्गाची वा नरकाची प्राप्ती होते व शेवटी तो परमेश्वरात लय पावतो, असेच समजले जाते.

ह्या जागृत लोकांच्या अनुभवात व मृत्युसम अनुभव घेतलेल्या लोकांच्या अनुभवात सारखेपणा आढळतो. ही वर्णने अनेक धर्मग्रंथात आलेल्या अनुभवांशी मिळती जुळती आहे. ह्या धर्मग्रंथातही शरीर सोडल्यानंतरच्या आत्मप्रवासाबाबत असेच सांगितले गेले आहे. मृत्युसम अनुभव घेतलेले अनुभव अंतरीच्या मंडळाच्या सिमेपर्यंतच येतात, कारण हे अनुभव सांगणारा, काक्ससाठी मृत्यु पावलेला नसतो, त्याचा प्रवास तेथेच संपतो, प्रवास अपुरा राहतो.

#### लोकांचा अनुभव

साधुसंतांचे उपदेश व मृत्युसम अनुभव घेतलेल्या लोकांनी दिलेली माहिती ही आत्म प्रवासाबाबत आम्हाला प्रेरणा देते. आत्मा अमर आहे, अशी आशा दाखविते.

परंतु एवढ्याने आमचे समाधान होत नाही. हे ज्ञान फक्त वाचलेले, शिकविले गेलेले वा सांगितले-ऐकले गेलेले आहे. परंतु आम्हीही अंतरी जाऊन आत्म्याच्या अमरपणाबद्दल अनुभव घ्यावयास हवा. वेगवेगळ्या धर्मातील साधुसंतांनी ज्या पद्धतीचा वापर केला, त्याचा अभ्यास करून आम्हीही ही पद्धत शिकू शकतो व ह्या मिळालेल्या ज्ञानानुसार आम्ही स्वतः ध्यानाभ्यास करुन आत्मानुभव घेऊ शकतो. ह्या पद्धतीचा ह्या पुस्तकात पुढे समावेश केला आहे.

अभ्यास - मानसिक तणावांतून मुक्त व्हा ! ध्यान धारणेस बसा ! आपल्या शरीराची जाणीव दूर करा, मनाला स्थिर करा! बघा! आपले मन आणि शरीर शांत झाल्यावर, शरीराचा कोणता भाग

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

एखादी गुठळी झाली तर शरीर बधिर होतं किंवा वेदना होतात. त्याचप्रमाणे, आत्म्याचे गुणही निसर्गाप्रमाणे सतत प्रवाही असायला हवेत.

जर आपण दान करायचं ठरवलं तर त्यामागचा हेतू उदात्त का नसावा? आज आपण स्वयंसेवा करतानाही अपेक्षा ठेवतोच. मग ती इतरांसाठी केलेली सेवा नाही. आपल्याला दाता बनायचं असेल तर त्याची सोपी पद्धत म्हणजे दररोज कामावर जाताना आपल्या चेतनेमध्ये थोडा बदल करणं. सगळे असाच विचार करतात की काहीतरी मिळवण्यासाठी आपण कामावर जातो.

सुरेश ओबेरॉय :
आपल्याला पैसे मिळतात.

#### व्यावहारिक जग

शिवानीदीदी :
व्यापार, नोकरी किंवा व्यवसाय, काहीही असलं तरीही आपल्याला माहीत आहे की आपण पैसे कमवायला जात आहोत. हाच कामामागचा हेतू असतो. याचबरोबर कामावर जाताना आपण एक विचार निर्माण करू शकतो की, आज दिवसभरात जो कोणी मला भेटेल त्याला मी काहीतरी देईन.

जर तुम्ही अभिनेते असाल, तर स्पॉटबॉयपासून ते दिग्दर्शकापर्यंत सगळ्यांना काही ना काही द्याल. काहीतरी देणं म्हणजे आपल्याकडची माहिती किंवा वस्तू काहीही वाटणं. आजकालच्या व्यावहारिक जगात आपल्याकडे असलेली माहिती, हुशारी, कौशल्य आणि सुज्ञता फक्त आपल्यापुरताच मर्यादित ठेवणं हा काळजीचा विषय आहे. एखाद्याला आपण विचारलं, हा पदार्थ तुम्ही कसा बनवला ? तर ते सांगतानाही लोक आढेवेढे घेतात.

पण गोष्टी फक्त आपल्याकडेच ठेवण्यात आपली प्रगती नाही हे आपल्याला समजत नाही. आपण आपल्याकडची माहिती इतरांना देत नाही कारण ते आपल्या पुढे जातील अशी भीती आपल्याला वाटते. अशा प्रकारे आपण स्वतःवर मर्यादा घालतो आणि थांबतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

चिंटू: काल स्वप्नात एक मुलगी आली, म्हणाली- फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठव तरच बोलेन!
गंपू: मग काय केलंस?
चिंटू : काय करणार, स्वप्नातून जागा झालो आणि रात्रभर पासवर्ड शोधत बसलो!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताचे 'प्रवेशद्वार' असे कोणत्या शहराला म्हटले जाते?

– मुंबई

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

#### मेथी

घ्यावा. याने हाडांमधील झीज भरून येऊन व श्लेष्मक कफ (दोन सांध्याच्यामधील वंगण) तयार होऊन सांधेदुखीचा त्रास कमी होतो.

२) कोरडा खोकला, सर्दी यामुळे घसा खवखवत असतो. अशा वेळी अर्धा लिटर पाण्यात सात-आठ भेंड्या उकळून काढा करावा व तो काढा प्यावा. याने घशातील कोरडेपणा कमी होऊन खवखव थांबते. तसेच उकळत्या पाण्यात चिरलेली भेंडी टाकून त्यांची वाफ घेतली असता सर्दी कमी होते.

३) भेंडीमध्ये कॅल्शिअम विपुल प्रमाणात असल्यामुळे बालकांची वाढ व स्त्रियांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी आहारामध्ये नियमितपणे भेंडीच्या भाजीचा वापर करावा.

४) वंध्यत्व असणाऱ्या पुरुषांनी शुक्रजंतूंची निर्मिती चांगली होण्यासाठी आहारामध्ये भेंडीची भाजी नियमित खावी. तसेच भेंडीची मुळे सुकवून त्याचे चूर्ण तयार करून ते चूर्ण पाच-दहा ग्रॅम दुधातून घ्यावे. यामुळे शुक्रजंतूंची वाढ चांगली होते.

५) चेहरा काळवंडला असेल व रूक्ष होऊन सुरकुत्या पडल्या असतील, तर चेहऱ्यावर भेंडीची पेस्ट रात्री झोपण्यापूर्वी लावावी व हलक्या हाताने मसाज करावा. असे केल्याने चेहऱ्याची त्वचा उजळ, कांतियुक्त व मऊ होते. चेहरा गोरा व सतेज दिसतो.

६) पोट, मूत्रमार्ग, जननेंद्रिय यांची जर जळजळ होत असेल, तर दहा ते बारा भेंड्या एक लिटर पाण्यात उकळून त्याचा काढा बनवावा व त्यामध्ये चिमूटभर सैंधव, एक चमचा लिंबाचा रस घालावा. तो काढा दिवसभर थोड्या थोड्या अंतराने घ्यावा. यामुळे शरीराची उष्णता कमी होऊन जळजळ कमी होते.

अनेक वेळा स्त्रियांना अंगावरून पांढरे पाणी जाणे (श्वेतप्रदर) या समस्येचा त्रास होतो. अशा वेळी भेंडीमुळाचे चूर्ण एक चमचा, पुष्यानुग चूर्ण एक चमचा मधात कालवून त्याचे सकाळ-संध्याकाळ चाटण करावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडूळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# संचेती हॉस्पिटलतर्फे डॉ.के.एच.संचेती मेडी रत्न पुरस्काराची स्थापना; पहिला पुरस्कार फिजिशियन डॉ. कल्याण एम. गंगवाल यांना प्रदान

पुणे – संचेती हॉस्पिटल तर्फे डॉ.के. एच.संचेती मेडी रत्न पुरस्काराची स्थापना करण्यात आली आहे. हा पुरस्कार मेडीजैन कम्युनिटीच्या सहकार्याने सुरू करण्यात आला आहे. वैद्यकीय सेवेच्या पलीकडे जाऊन समाजावर अर्थपूर्ण व दीर्घकालीन प्रभाव निर्माण करणाऱ्या डॉक्टरांचा गौरव करण्यासाठी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.



राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त आयोजित पहिल्या सोहळ्यात पहिला मेडी रत्न पुरस्कार फिजिशियन डॉ. कल्याण मोतीलाल गंगवाल यांना प्रदान करण्यात आला.

नुकतेच झालेल्या राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त याअंतर्गत पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याअंतर्गत पहिला पुरस्कार फिजिशियन डॉ. कल्याण मोतीलाल गंगवाल यांना प्रदान करण्यात आला. डॉ.कल्याण गंगवाल हे प्रतिष्ठित वैद्यकीय तज्ञ असून कॅरियम हॉस्पिटल, पुना हॉस्पिटल आणि ससून हॉस्पिटल यांसारख्या नामांकित संस्थांशी त्यांची कारकीर्द जोडलेली आहे.

या पुरस्कार सोहळ्याला दर्शन आय केअर सेंटरचे संस्थापक व वरिष्ठ नेत्रशल्यचिकित्सक आणि मेडिजैनचे आश्रयदाता डॉ.जिग्नेश तसवाला, संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सचे अध्यक्ष डॉ. पराग के.संचेती, मेडिजैनचे आश्रयदाता व फॅमिली फिजिशियन डॉ. पराग जैन, मानद अध्यक्ष आणि कॉस्मेटोलॉजिस्ट व त्वचारोगतज्ञ डॉ.ज्योती संघवी, मानद सचिव व फॅमिली फिजिशियन डॉ.सोनल पालरेचा, मानद खजिनदार व वरिष्ठ दंतचिकित्सक आणि कॉस्मेटोलॉजिस्ट डॉ.आरती भटेवरा आणि संचेती हॉस्पिटलच्या होम हेल्थकेअर व संपर्क विभागाच्या संचालिका रूपल संचेती, अर्चना संचेती, संचेती अ‍ॅडव्हान्स्ड आर्थोकेअर हॉस्पिटलचे प्रमुख यशवंत शिवण्णा आदी उपस्थित होते.

संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सचे अध्यक्ष डॉ. पराग के. संचेती म्हणाले की, माझ्या वडिलांनी संचेती हॉस्पिटलची स्थापना हीरुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या एका साध्या पण मोलाच्या विचारावर केली. त्यांनी आम्हाला नेहमीच हे शिकवले की, डॉक्टरांचे कर्तव्य हे केवळ रुग्णालयाच्या दारापर्यंत मर्यादित नसते. आजही ते रूग्णालयात येतात तेव्हा त्यांचे मोलाचे मार्गदर्शन सर्वांना करत असतात. ज्यांचे कार्य केवळ उपचारांपुरते मर्यादित नसून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवणारे आहे, अशा डॉक्टरांचा डॉ.के.एच.संचेती मेडी रत्न पुरस्काराने गौरव केला जातो. डॉ. कल्याण गंगवाल यांनी आपल्या कार्यातून उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. या पुरस्काराचे पहिले मानकरी म्हणून डॉ. कल्याण गंगवाल हे योग्य व्यक्ती आहेत, असा आमचा ठाम विश्वास आहे.

यावेळी मेडीजैनच्या अध्यक्ष डॉ. ज्योती संघवी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. वैद्यकीय सेवेच्या पलीकडे जाऊन समाजावर सकारात्मक प्रभाव निर्माण करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांचा सन्मान होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.के.एच.संचेती मेडी रत्न पुरस्काराची सुरूवात करून, समाजसेवा, करुणा आणि समर्पणातून वैद्यकीय क्षेत्रासह संपूर्ण समाजाला प्रेरणा देणाऱ्या डॉक्टरांचा गौरव करण्याची प्रेरणादायी परंपरा निर्माण करण्याचा संचेती हॉस्पिटलचा उद्देश आहे.

उत्कृष्ट वैद्यकीय सेवेसोबतच डॉ. गंगवाल यांनी अनेक दशकांपासून शाकाहार, अहिंसा, प्राणी कल्याण, व्यसनमुक्ती जनजागृती आणि निरोगी जीवनशैली या मूल्यांचा प्रसार केला आहे. सार्वजनिक व्याख्याने, पुस्तके, प्रदर्शने आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी असंख्य लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पाडला असून समाजसेवेप्रती असलेल्या त्यांच्या आजीवन बांधिलकीमुळे ते आजही समाजाला प्रेरणा देत आहेत.

प्रत्येक संस्थेची एक कहाणी असते. पद्मविभूषण डॉ. के.एच.संचेती यांच्या अथक कार्यातून संचेती हॉस्पिटलची कहाणी सुरू झाली. अस्थिरोग शास्त्रातील उत्कृष्ट सेवा, वैद्यकीय शिक्षण आणि करुणामय आरोग्यसेवा याबाबत त्यांच्या अविरत योगदानामुळे भारतातील अत्यंत प्रतिष्ठित अस्थिरोग उपचार संस्थांपैकी एक अशी या संस्थेची ओळख निर्माण झाली. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक सन्मानांनी गौरविलेला त्यांचा प्रेरणादायी प्रवास आरोग्यसेवा क्षेत्रातील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत आहे. आजही तरूणांशी संवाद साधत ते नवीन पिढीला प्रेरणा देत आहेत.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वैराग्य बहुत अवघड




असू दे, असे मी वदे. याचा अर्थ मी केवढा सहनशील हे लोकांना दिसू दे. या सहनशीलतेतील खरी असहनशीलता लपू दे. माझ्या 'असू दे'चा खरा भाव आहे 'नसू दे.' ही एक प्रकारे दुसऱ्याची निंदा. हा कावळ्याने बगळ्याला. तू काळा म्हणण्याचाच धंदा. महाभारतात म्हटलंय, अतो हास्यतरं लोके किंचिदन्यन्न वर्तते। यत्र दुर्जनमात्याह दुर्जन : सज्जनं स्वयम् ।।

कुणालाही हसायला येईल. जेव्हा स्वतः दुष्ट आणि सुजनाला म्हणतो. तू नतद्रष्ट. स्वतः वागायचे अनिष्ट आणि शिष्टाला म्हणायचे, की तुझे हे वागणे काय इष्ट ? जगावर असलेल्या उफराट्या वर्तनाचे नेहमीच कोसळते अरिष्ट ।

स्वतःला धुतल्या तांदळासारखे समजायचे, दुसऱ्याला त्याच्या पापाची क्षमा केल्यासारखे दाखवायचे तसे भासवायचे. नुसता त्रागा करायचे. असे स्मशान वैराग्यच धारण करायचे. असू दे म्हणणाऱ्याला खरे का वैराग्य आले असे समजायचे? महिपती संतलीलामृतात म्हणतात, विष घेववेल ग्रासोग्रासी । पाई चालवेल आकाशी । बाही पोहोनी सागरासी। पैल तीरासी पाववेल परि वैराग्य बहुत अवघड जाण रोकडे नृपनाथा।

खरोखर क्षमाशील वृत्ती अंगी बाणवणे अत्यंत कठीण. त्यासाठी जे मानसिक वैराग्य यावे लागते, ते तर त्याहून कठीण. महिपती म्हणतात. एकदाचे विष घेणे सोपे. अगदी प्रत्येक घासांतदेखील! आकाशात माणूस पायी पायी चाललाय हे देखील होईल. केवळ हातांनी पाणी कापीत समुद्रातदेखील माणूस पोहील, पैलतीरालादेखील जाईल. पण वैराग्य खरोखर अंगी बाणवील, हे केवळ अशक्यच. हे माझे वचन नेहमी ठरेल सत्यच. संत नामदेव म्हणतात, अवघें जन्म वाया गेले विषयासंगे। शिणलेती वाउगे माया मोहे ।।

ययाती राजाची कहाणी, माणसाची हीच अवस्था दाखवते केविलवाणी. ययाती राजा शंभर वर्षे जगला. खूप ऐश्वर्य. सार्वभौमत्व देखण्या राण्या. शंभर पुत्र. मृत्युसमय जवळ आला. यम दारी उभा राहिला. ययाती म्हणाला, एवढ्या लवकर आलास? माझ्या वासना तृप्त झाल्या नाहीत, अजून आणखी हवीत शंभर वर्षे.

यम म्हणाला, देईन. पण एका अटीवर. तुझ्या पुत्रांपैकी तुझ्यासाठी मरायला हवं कुणीतरी. मला बरोबर न्यायलाच हवे कुणाला तरी. आदेश तर पाळलाच पाहिजे.

ययातीच्या शंभर पुत्रांपैकी बरेच पंचाहत्तरी ओलांडलेले होते. तरी वडिलांऐवजी कुणीही मरायला तयार नव्हते. कुणाचीच तृप्ती झाली नव्हती. विषयोपभोगांपासून उपरती होत नव्हती. ययाती दुःखी. त्याच्या ९९ पुत्रांनी घेतली मृत्यूची धास्ती. फक्त सगळ्यात लहान तयार झाला. केवळ सतरा वर्षे वयाचा अद्याप अविवाहित. ययाति शरमला.

मृत्यूला त्याची कीव आली. मृत्यु त्या लहानग्या पुत्राला म्हणाला, अरे, तुझे ९९ भाऊ बघ. म्हातारे जख्ख, ना उरले. त्राण पण सोडायला तयार कुठे प्राण? तू तर जग पाहिले नाहीस. उपभोग तुला ठाउकच नाही. विषयांचा अनुभव घेतलाच नाही. तरी मरायला तयार ?

तो म्हणाला, होय! त्यांचे व वडिलांचेही उदाहरण पाहिले, म्हणून तयार झालो. मला समजलेय, की उपभोगांपासून सुटका, त्यांचा चटका लागण्यापूर्वीच. उपभोग म्हणजे दुःखाचेच योग. मग वडिलांसाठी तो मृत्यूच्या स्वाधीन झाला. असे ज्ञानामुळे येणारे वैराग्य मोलाचे.

**– किशोर गांधी**

# डॉ.अखिल देशमुख 'एफएमजीई परीक्षा'उत्तीर्ण



गुंडेगाव – कठीण समजली जाणारी Foreign Medical Graduate Examination (FMGE) परीक्षेमध्ये डॉ. अखिल देशमुख यांनी उत्तीर्ण झाले आहेत. परदेशातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी एफएमजीई परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. कठोर अभ्यास, सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर डॉ. अखिल देशमुख यांनी हे यश मिळवून आपल्या कुटुंबासह गावाचे नाव उंचावले आहे. डॉ. अखिल हे ग्रामपंचायत गुंडेगावच्या संगणक ऑपरेटर वैशाली देशमुख आणि पशुवैद्यकीय डॉक्टर अनिल देशमुख यांचे पुत्र आहेत.

# पै. नाना डोंगरे यांचा राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव

नगर – यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने पै. नाना डोंगरे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवानिमित्त शहरात झालेल्या धनगर समाजाच्या मेळाव्यात डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी अशोक सुर्यवंशी, प्राचार्य तुळशिराम भोजने, यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, सरचिटणीस अजय जाडकर, मच्छिंद्र बिडगर, शर्मिला नलावडे, पुणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रेश्मा पुणेकर आदी उपस्थित होते.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्राम पंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी



यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने पै. नाना डोंगरे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.

ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले आहेत.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे अशा विविध सामाजिक उपक्रम इंद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. महिला बचत गट मेळावे, युवा संमेलने, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनातून ग्रामीण समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. साहित्य क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच सहा ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र भूषण प्रदान करण्यात आला.



यशवंत सेना आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने संतोष कानडे यांना लोकमाता अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# संतोष कानडे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



नगर – यशवंत सेना आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने संतोष कानडे यांना लोकमाता अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शहरात अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या धनगर समाजाच्या मेळाव्यात कानडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संतोष कानडे हे न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज अहिल्यानगर येथे प्रशासकीय कर्मचारी म्हणून सेवेत आहेत. कानडे यांनी सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना पुरस्कार देण्यात आला. कानडे यांनी वाचन चळवळ वृध्दींगत व्हावी, यासाठी राष्ट्रीय सण, उत्सव, राष्ट्रपुरुषांच्या जयंती, वाढदिवस या निमित्ताने विविध शाळा महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये यांना १००० वर पुस्तके भेट दिली आहेत. वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, मतदार जनजागृती, मुलींच्या जन्माचे स्वागत उपक्रमा अंतर्गत माताचा पालकांचा सन्मान, रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

गरीब शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, शाळा महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन, समाजातील दुर्बल घटकातील कुटुंबांना शासकीय योजनांची माहिती देवून योजना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटना माध्यमातून कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न व प्रस्ताव मंजूरीसाठी उच्च शिक्षण विभागाकडे प्रयत्न केले आहेत. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना लोकमाता अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

कानडे यांना यापूर्वी देखील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा गुणवंत कर्मचारी पुरस्कार, शब्दगंध साहित्यिक परिषदेचा सामाजिक कार्य गौरव पुरस्कार, विविध सामाजिक संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

पुरस्कार मिळाल्याबद्दल चर्मकार विकास संघ प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, आमदार संग्राम जगताप, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सर्व पदाधिकारी कार्यकारिणी सदस्य, न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज अहिल्यानगरचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# शिक्षणासाठीची मदत हीच खरी समाजसेवा

## हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांचे प्रतिपादन; गरजवंत विद्यार्थ्यांना पुस्तक संचांचे वाटप

नगर – गरजवंत विद्यार्थ्यांना योग्य वेळी शैक्षणिक साहित्याची मदत करणे हे समाजोपयोगी आणि प्रेरणादायी कार्य असून ज्ञानदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. शिक्षणाच्या बळावरच सुसंस्कृत आणि सक्षम भारताची निर्मिती होऊ शकते, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी केले.



हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात इयत्ता नववीतील गरजवंत विद्यार्थ्यांना नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या वतीने नववीच्या पुस्तकांचे संपूर्ण संच प्रदान करण्यात आले.

हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात इयत्ता नववीतील गरजवंत विद्यार्थ्यांना नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या वतीने नववीच्या पुस्तकांचे संपूर्ण संच प्रदान करण्यात आले.

यावेळी सुमतीलाल कोठारी, विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन झालानी, मुख्याध्यापक अशोक डोळसे, शिक्षिका प्रतिनिधी सौ. निमा राहींज यांच्यासह शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात सुमतीलाल कोठारी म्हणाले की, गरजवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. अशा मदतीमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळते आणि ते आपल्या कुटुंबासह शाळेचे नाव उज्वल करतात. हिंद सेवा मंडळ ही संस्था समाजातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याबरोबरच त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी कायम कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

चेअरमन अजित बोरा यांनी शिक्षणासारख्या पवित्र कार्यासाठी दिलेले सहकार्य अत्यंत मोलाचे असून अशा उपक्रमांमुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळते, असे सांगितले.

नगरसेवक सागर मुर्तडकर यांनी मनोगतात सांगितले की, शिक्षण ही काळाची गरज असून गेल्या आठ ते दहा वर्षांपासून बालवाडीपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत आपल्या क्षमतेनुसार शैक्षणिक मदत करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. हिंद सेवा मंडळ ही सर्वसामान्यांच्या मुलांना प्रामाणिकपणे शिक्षण देणारी संस्था असून सीताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काही करता आल्याचा मनापासून आनंद होत असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातही विद्यालयाच्या प्रत्येक विधायक उपक्रमात सहभागी होण्याची ग्वाही त्यांनी दिली. यानंतर विद्यार्थ्यांना नववीच्या पुस्तकांचे संच वितरित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी स्वागत केले. पुस्तक पेढीच्या प्रमुख श्रीमती क्रांती मुंदानकर यांनी सूत्रसंचालन, परिचय आणि सन्मान केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश नागपुरे, ज्येष्ठ शिक्षक रवींद्र चोभे, वृषाली जोशी, संजय शेकडे आदींनी विशेष सहकार्य केले.

# मर्चंटस् को-ऑप.बँकेच्या चेअरमनपदाचा पद्‌भार संजय चोपडा यांनी स्वीकारला

## चेअरमनपदाची धुरा उत्कृष्टरित्या सांभाळून संजय चोपडा हे बँकेला प्रगतीपथावर नेतील : आ. संग्राम जगताप

नगर – मर्चंटस् को-ऑप.बँकेच्या चेअरमनपदी संजय फुलचंद चोपडा यांची एकमताने निवड झाल्याबद्दल त्यांच्या पदग्रहण समारंभास आमदार संग्राम जगताप यांनी बँकेतील प्रधान कार्यालय येथे सदिच्छा भेट देऊन संजय चोपडा यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी मावळते चेअरमन हस्तीमल मुनोत, व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक अनिल पोखरणा, संजय बोरा, किशोर गांधी, सीए मोहन बरमेचा, संजीव गांधी, सुभाष बायड, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, जॉईंट सी.ई.ओ. नितिन भंडारी व नगरसेवक गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, नगरसेवक अविनाश घुले, निखिल वारे, अनिल बोरूडे, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, डॉ. आशिष भंडारी, मिलिंद कुलकर्णी, माजी महापौर भगवान फुलसौंदर, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष अशोक गांधी, वसंत पोखरणा, अमित गटणे, करण भळगट, रविंद्र बाकलीवाल, प्रदिप मुथा, राजेंद्र गांधी, अशोक गायकवाड, रविंद्र सेलोत, अमोल पोखरणा, नंदकुमार मेहेर, राहुल सोनीमंडलेचा, डॉ. अरविंद गुगळे, सुधिर लांडगे, प्रितम गांधी, डॉ. प्रकाश कराळे, किरण पोखरणा, राजु लुणिया, विशाल पवार आदी उपस्थित होते.



मर्चंटस् को-ऑप.बँकेच्या चेअरमनपदी संजय फुलचंद चोपडा यांची एकमताने निवड झाल्याबद्दल त्यांच्या पदग्रहण समारंभास आमदार संग्राम जगताप यांनी बँकेतील प्रधान कार्यालय येथे सदिच्छा भेट देऊन चेअरमन संजय चोपडा यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अनिल पोखरणा यांनी बँकेच्या वतीने स्वागत केले. याप्रसंगी संचालक संजीव गांधी यांनी बँकेविषयी माहिती देताना सांगितले की, आज रोजी बँकेच्या असलेल्या ठेवी १६४२ कोटी रूपये व कर्ज १०३९ कोटी रूपये आहेत. तसेच बँकेच्या प्रगतीचा आलेख हा उंचावत असून तो भविष्यातही असाच वाढता ठेवण्याची कामगिरी संजय चोपडा हे अत्यंत उत्कृष्टरित्या पार पाडतील, असा विश्वास व्यक्त करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

आमदार संग्राम जगताप यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संजय चोपडा यांना सहकार खात्याचा, महानगरपालिकेतील नगरसेवक पदाचा, राजकीय, सामाजिक व इतरही कामकाजाबाबत प्रदिर्घ अनुभव असल्याने चेअरमन म्हणून बँकेची धुरा उत्कृष्टरीत्या सांभाळतील व त्यांच्या काम करण्याच्या पद्धती व शैलीनुसार ते बँकेस प्रगतीपथावर नेतील असा विश्वास व्यक्त केला. बँकेचे शासनदरबारी असलेल्या कामाबाबत माझे बँकेस कायमच सहकार्य राहील, असा शब्द त्यांनी दिला.

आमदार संग्राम जगताप यांचा सत्कार बँकेकडून संचालक अनिल पोखरणा यांनी केला. तसेच हस्तीमल मुनोत व संजय चोपडा यांचा सत्कार आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.

# धम्माल मनोरंजन

**सुविचार**



**''मूर्ती लहान पण किर्ती महान'' लालबहादूर शास्त्री यांची उंची कमी होती पण आपल्या कार्याने, कर्तृत्वाने ते महान बनले.**

## दिनविशेष १० जुलै

१९०३ : रा. भि. जोशी साहित्यिक यांचा जन्म.१९१३ : पद्मा गोळे कवयित्री यांचा जन्म. (मृत्यू: १२ फेब्रुवारी १९९८)

१९१४ : जो शस्टर सुपरमॅन हिरो चे सहनिर्माते यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९९२)

१९२१ : हार्वे बॉल स्माईली चे निर्माते यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल २००१)

१९२३ : जी. ए. कुलकर्णी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते कथालेखक यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर १९८७)

१९३४ : डॉ. रजनीकांत आरोळे पद्मभूषण विजेते जामखेड मॉडेल चे जनक यांचा जन्म.

१९४० : लॉर्ड मेघनाद देसाई अर्थशास्त्रज्ञ आणि इंग्लंडच्या हाऊस ऑफ लॉर्ड्स चे सभासद यांचा जन्म.

१९४३ : आर्थर ॲश अमेरिकन टेनिस खेळाडू यांचा जन्म. (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९९३)

१९४५ : व्हर्जिनिया वेड इंग्लिश टेनिस खेळाडू यांचा जन्म.

१९४९ : सुनील गावसकर क्रिकेटपटू समालोचक यांचा जन्म.

१९५० : बेगम परवीन सुलतानाफ पतियाळा घराण्याच्या शास्त्रीय गायिका यांचा जन्म.

१९५१ : राजनाथ सिंह भारतीय राजकारणी व भारताचे २९ वे संरक्षण मंत्री यांचा जन्म.मृत्यू :१५५९ : हेन्री (दुसरा) फ्रान्सचा राजा यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १५१९)

१९६९ : डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर इतिहासकार यांचे निधन. (जन्म: ३० मे १८९४)

१९७० : ब्यार्नी बेनेडिक्ट्सन आईसलँडचे पंतप्रधान यांचे निधन.

१९७१ : भिखारी ठाकूर भोजपुरी भाषेचे शेक्सपिअर यांचे निधन. (जन्म: १८ डिसेंबर १८८७)

१९८९ : प्रभाकर ऊर्ध्वरेषे साम्यवादी विचारवंत साहित्यिक यांचे निधन.

१९९५ : डॉ. रामकृष्ण विष्णू केळकर गरिबांचे डॉक्टर म्हणून प्रसिद्ध यांचे निधन.

२००० : वक्कम मजीद भारतीय पत्रकार आणि राजकारणी यांचे निधन. (जन्म: २० डिसेंबर १९०९)

२००५ : जयवंत कुलकर्णी पार्श्वगायक यांचे निधन. (जन्म: ३१ ऑगस्ट १९३१)

२०१३ : गोकुलानंद महापात्राफ भारतीय लेखक यांचे निधन. (जन्म: २१ मे १९२२)

२०१४ : जोहरा सेहगल भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना आणि नृत्यदिग्दर्शक यांचे निधन. (जन्म: २७एप्रिल १९१२)

मिया मूठभर, दाढी हातभर.
अर्थः आठ हात लाकूड, नऊ हात धलपी.
माळी तशा बाग आणि कोळी तसा धागा.
अर्थः कुशल माणसाप्रमाणेच कुशल काम.
मारून मुटकून मुसलमान.
अर्थः इच्छा नसताना जरबदस्तीने काम करून घेणे.

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) चकाकीत पितळ धातु
३) धंदा
६) हत्ती
७) जिम्मा
१०) बेढब, खरखरीत
१२) पवनपुत्र
१४) देश, प्रांत
१५) कुजलेले शेण
१७) एक राग
१९) जागृत स्थिती
२१) सफरचंद
२३) सखा, प्रियकर
२४)भारतातील एक तीर्थस्थळ
२६)नमलेला
२७)एक प्रसिद्ध चित्रपट निर्माता
२९) सत्यत्वाची
३०) चुना
३१) रजनी
३२) एक मराठी चित्रपट
३६) प्रथम, सुरुवातीचा
३७) जमिनीचा सारा
३८) एकाग्र नजर
४०) राऊ, राजा
४१) घोडेस्वारांची टोळी
४२) एक इंग्रजी अक्षर
४४) जाड कापड
४५) माहिती असणारा
४७) शिजवून गरगटलेली दाळ
४८) जासुद
४९) भुतकाळ

### उभे संकेत

१) अल्प परिचय
२) पंख, फांद्या इ. तोडणे, उपडणे
३) प्रत्येक दिवशी
४) रात्र ५) पाठांतर, चिंतन
६) लहान किल्ला ८) माजणे
९) पक्के, ठरविणे ११) एक टुथपेस्ट
१२) शेवट, समाप्ती
१३) लोकांना जागृत करणे
१४) ओसाड, वश १६) चंचलपणा
१७) हिंस्त्रपणा सोडून दिलेला
१८) सोने २०) उस
२१) एक हिरवी पालेभाजी
२२) थट्टा, मस्करी२४) गोळा, एकत्र
२५) थंडीने वा भितीने अंग कापणे
२६) शृंगार, नटणे
२८) अलका नावाची मराठी हिरोईन ३०) बैलाला बांधावयाची दोरी ३३) सुंदर अवयवांची
३४) मध्यम प्रतिचा
३५) लहर, हुक्की
३९) हाताचा तडवा
४०) इंदिरापुत्र ४१) एक तळून किंवा भाजून खाण्याचा पदार्थ
४२) रोग ४३) स्वदेश
४४) तणाव
४६) एक स्त्रिदर्शक उच्चार

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | ल | ता | ड | न | ■ | सं | जी | व | कु | मा | र | ■ |
| ग | ■ | प | र | वा | न | गी | ■ | ■ | श | वा | स | न |
| र | पे | ट | ■ | ज | ग | त | शे | टी | ■ | ■ | द | ■ |
| हा | र | णे | ■ | ■ | मा | ■ | त | ■ | कै | ■ | ■ | धुं |
| टी | ■ | ■ | पा | द्री | ■ | खा | ■ | वा | द | वि | वा | द |
| ■ | क | व | च | ■ | ला | डू | बा | ई | ■ | चा | ■ | ■ |
| स | म | ■ | क | ढ | ई | ■ | जा | ट | ■ | र | का | ना |
| मा | ता | ली | ■ | ब | ट | वा | ■ | ■ | सा | वं | त | ■ |
| धा | क | ■ | धं | दा | ■ | त | ■ | क | म | त | र | ता |
| न | द | ■ | ■ | र | ■ | च | व | दा | र | ■ | वे | ग |
| ■ | ■ | आं | बा | ■ | व | क्र | ■ | चि | ■ | का | ळ | ■ |
| क | ढी | ■ | ग | ज | र | ■ | म | त | दा | र | ■ | सं |
| सा | ग | र | ■ | ज | न | म | त | ■ | न | वा | ग | त |

१) मीठाला रासायनिक भाषेत काय म्हणतात?
अ)पोटॅशियम क्लोरेट ब)सोडियम नायट्राईड क)पोटॅशियम नायट्राईडड) सोडियम क्लोराईड

२) संत एकनाथाचे समाधी कोठे आहे?
अ)पंढरपूर ब)देहू क)पैठण ड)औरंगाबाद

३) तांदुळासाठी प्रसिद्ध खोरे कोणते?
अ)तापी ब)गोदावरी क)कृष्णा ड) वैनगंगा

४) राज्यातील एकमेव औद्योगिक बँका कोणत्या ठिकाणी आहे?
अ)सोलापूर ब)कोल्हापूर क)पुणे ड)सातारा

५) कोणता मासा गोळ्या पाण्यातील शार्क म्हणून ओळखला जातो?
अ)भागूर ब)पत्थरचारन क)शिवडा ड)मरळ

६) कापसाचा धागा त्या वनस्पतीच्या कोणत्या भागापासून मिळतो?
अ)खोड ब)फूल क)पाने ड)फळ

७) कोणत्या जलधारणा शक्ती अधिक असते?
अ)खोल ब)उथळ क)मध्यम खोल ड) यापैकी नाही

८) मेंढीची लांब लोकर देणारी जात कोणती?
अ)बन्नूर ब)लिंकन क)मेरीनो ड)डॉर्सेट

९) सर्वाधिक फॉस्फरस कोणत्या खतात असते?
अ)ट्रिपल सुपर फॉस्फेट ब)सिंगल सुपर फॉस्फेट क)डायक्लोरो फॉस्फेट ड) रॉक फॉस्फेट

१०) कोणत्या खतात नायट्रोजनचे प्रमाण सर्वात अधिक असते?
अ)बोरॉन ब)सुपर फॉस्फेट क)युरीया ड) पॅरिस ग्रीन

११) द्राक्षांचा आकार वाढावा यासाठी कशाची प्रक्रिया करतात?
अ)सायट्रीक आम्ल ब)ग्लुटॅमिक आम्ल क)ग्लुकोनीक आम्ल ड)जिबरेलिक आम्ल

१२) हाडे व दात निरोगी ठेवण्यासाठी फ्लुओरिन किती प्रमाणात आवश्यक आहे?
अ)अल्प ब)जास्त क)सुक्ष्म ड)यापैकी नाही

१३) खालीलपैकी कोणते मुलद्रव्य नाही?
अ)लोखंड ब)पारा क)मीठ ड)चांदी

१४) शेतीला कोणत्या पंचवार्षिक योजनेत प्राधान्य दिले गेले?
अ)चवथ्या ब)दुसऱ्या क)पाचव्या ड)पहिल्या

१५) पदार्थाच्या स्थायु अवस्थेतून द्रव्य अवस्थेत रुपांतर होण्याच्या क्रियेला काय म्हणतात?
अ)बाष्पीभवन ब)सांद्रन क)द्रविकरण ड)संघनन

१६) कोणता रोग जलप्रदुषणामुळे होत नाही?
अ)मधुमेह ब)पटकी क)आतड्यांचे रोग ड) कावीळ

१७) ध्वनीच्या अभ्यास शास्त्राला काय म्हणतात?
अ)एन्टॅमॉलॉजी ब)ऑर्निथॉलॉजी क)ॲस्ट्रॉनॉमी ड) अकॉस्टीक्स

१८) विद्युत मापन साधनाचे कार्य विद्युत धारेच्या कोणत्या चुंबकीय परिणामावर आधारित आहे?
अ)गॅल्होनोमीटर ब)व्होल्टमापी क)ॲमीटर ड) सर्व

१९) लोखंड व गंधक यांच्यात रासायनिक अभिक्रिया झाल्यास काय तयार होते?
अ)आयर्न सल्फाईड ब)आयर्न सल्फेट क)सल्फेट व आर्यन ड) सल्फर आयर्नाईड

२०) बिजाणूधानीतील बिजाणू कोणत्या रंगाचे असतात?
अ)हिरव्या ब)पिवळ्या क)पांढऱ्या ड)काळ्या

२१) प्लास्टीक व सश्लिष्ट पदार्थाचा रेणूभार किती असतो?
अ)जास्त ब)प्रचंड क)अत्यल्प ड) कमी

२२) नॉस्टॉक व ॲनाबेना हे कशाचे प्रकार आहेत?
अ)नीलहरीत शैवाल ब)स्पायरोगायरा क)कवक ड) सहजीवी जिवाणू

२३) कोणत्या तेलबीया कॅल्शीयमचा समृद्ध स्त्रोत आहे?
अ)तीळ ब)जवस क)सूर्यफुल ड)करडी

२४) माशांमध्ये वायुची बदलाबदल कशाद्वारे होते?
अ)वायू कोषांद्वारे ब)फुफ्फुसांद्वारे क)कल्ल्यांद्वारे ड)पंखाद्वारे

**उत्तरः (१-अ ),(२-क), (३-ड), (४-अ), (५-क), (६-ड), (७-ब), (८-ब), (९-अ), (१०-क), (११-ड ), (१२-अ), (१३-क), (१४-ड ), (१५-क), (१६-अ ), (१७-ड), (१८-ड), (१९-अ), (२०-ड), (२१-ब), (२२-अ), (२३-अ), (२४-क ),**

### देशातील ऊर्जा प्रकल्प

- मुचकुंदी प्रकल्प- मुचकुंदी नदीवरील आंध्रप्रदेश व ओरिस या राज्यांचा संयुक्त प्रकल्प, जलपुत येथे मुचकुंदी नदीवर धरण, मुख्य उद्देश वीजनिर्मिती.
- श्रीशैलम प्रकल्प- आंध्र प्रदेशात, कृष्णा नदीवर धरण. मुख्य उद्देश वीजनिर्मिती.
- बियास प्रकल्प- पंजाब, हरियाना व राजस्थान यांचा संयुक्त प्रकल्प. यामध्ये बियास- सतलज जोड कालवा व बियास नदीवरील पोंग येथील धरणाचा समावेश होतो.
- भाक्रा नानगल- पंजाब, हिमाचल प्रदेश, राजस्थान व हरियाना यांचा संयुक्त प्रकल्प. सतलज नदीवर हिमाचल प्रदेशात भाक्रा व पंजाबमध्ये नानगल अशी दोन धरणे, भारताची सर्वात मोठी बहुउद्देशीय योजना. भाक्रा हे देशातील सर्वांत उंच धरण आहे. उंची २२६ मीटर.
- दामोदर खोरे योजना- पश्चिम बंगाल व विभाजनपूर्व बिहारमधील संयुक्त बहुउद्देशीय योजना. जलसिंचन, वीजनिर्मिती, पूर- नियंत्रण इत्यादी



## फिल्मी शब्दकोडे



### आडवे संकेत

१) शंकर xxxxxxxx (गायक)
३) xxx हजारीका (संगीतकार)
५) सन् २००३ में बनी इस फिल्म में अजय देवगन और अभिषेक बच्चन थे.
७) xx टु का फोर (फिल्म)
८) सन् १९९५ में बनी पापी देवता इस फिल्म का नायक.
९) अर्जून रामपाल, दिया मिर्झा अभिनीत फिल्म.
११) खईके पान बनारसवाला... यह गाना इस फिल्म का है.
१२) एक पुराने मशहूर गीतकार.
१६) सन् १९९९ में बनी फिल्म वास्तव में संजय दत्त की माँ.
१७) xxxx शिवदासानी (नायक)
१८) मिथून चक्रवर्ती, आयशा जुल्का, राज बब्बर अभिनीत फिल्म.
२२) हम तुम दोनो जब मिल जायेंगे एक नया इतिहास.... यह गाना इस फिल्म का है.
२५) xx गगन की छांव में (फिल्म)
२७) सन् १९९९ में बनी इस फिल्म में अजय देवगन, तब्बू थे.
२८) xx परमेश्वर (फिल्म)
२९) सन् १९९१ में निर्देशक शशी कपूर की इस फिल्म में ऋषी कपूर और अमिताभ बचन थे.
३१) जाने xxx (फिल्म)
३२) सन् १९९३ में विनोद मेहरा के इस फिल्म में ऋषी कपूर, श्रीदेवी, अनिल कपूर थे.
३४) सन् १९९० में बनी बागी इस फिल्म की नायीका.
३५) सन् १९९४ में बनी फिल्म मोहरा का खलनायक.(सिर्फ नाम)

### उभे संकेत

१) डरना xx है (फिल्म)
२) सलाखे इस फिल्म में रविना टंडन के पिता.
३) एक अकेला इस शहर में रात में रात में और दोपहर में..... इस गाने का गायक.
४) xxxx नई रात (फिल्म)
५) xxx ललीत (संगीतकार)
६) xxx निश्चल (नायक)
१०) प्यार के दो xx (फिल्म)
१२) सन् १९९८ में निर्देशक एन. चंद्रा के इस फिल्म में मुकुल देव, माधूरी दीक्षीत थे.
१३) एक xxx हो सपनों का (फिल्म)
१४) सन् २००४ में बनी फिल्म चमेली की नायीका.
१५) सन् २००० में संजय गुप्ता की इस फिल्म में संजय दत्त, मनिषा कोईराला थे.
१७) xxx साथ (फिल्म)
१९) xxxxxxx मलमल का (फिल्म)
२०) जैकी श्रॉफ, पद्मिनी कोल्हापुरे की फिल्म.
२१) सन् १९९२ में बनी फिल्म चमत्कार का नायक.
२३) हिना इस फिल्म की नायीका.
२४) अमिताभ बचन, जॉन अब्राहम और बिपाशा बासू की फिल्म.
२६) xx अग्निहोत्री (नायीका)
२९) xxxx कोहली (नायक)
३०) xxx शेख (नायक)
३१) किरण कुमार के खलनायक पिता.
३३) सन् १९९७ में गुड्डू धनोवा की इस फिल्म में सनी देओल और रविना टंडन थे.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | म | दि | ल | दे | चु | के | स | न | म | ■ | ■ | ■ |
| म | ■ | ल | ■ | ■ | प | ■ | र | ■ | ■ | ■ | शो | ले |
| से | ■ | वा | ■ | ■ | के | ■ | फ | रि | श्ते | ■ | ला | ■ |
| ब | ■ | ले | ■ | ■ | चु | ■ | रो | ■ | ■ | ■ | औ | ■ |
| ढ | ■ | दु | ध | ■ | प | ■ | श | ■ | कु | द | र | त |
| क | ■ | ल्ह | ■ | अ | के | ला | ■ | ■ | छ | ■ | श | ■ |
| र | ■ | नि | ■ | ल | ■ | ■ | ■ | ■ | बी | ■ | ब | ■ |
| कौ | ■ | या | रों | का | या | र | ■ | ■ | क | ■ | न | ■ |
| न | ■ | ल | ■ | ■ | ■ | जा | न | ते | रे | ना | म | ■ |
| ■ | रा | जा | बा | बु | ■ | ■ | ■ | ■ | गा | ■ | ■ | ■ |
| जां | ■ | ऐं | ■ | ल | ■ | दो | स्ता | ना | ■ | ■ | जी | त |
| बा | ■ | गे | ■ | बु | लं | दी | ■ | रा | म | जा | ने | ■ |
| ज | ग्गु | ■ | शु | ल | ■ | ल | ■ | ज | ■ | ■ | दो | स्त |

### विनोद



आई : 'इतक्या उशिरापर्यंत तू बाहेर राहावी हे मला मुळीच सहन होणार नाही...'
मुलगी :'पण...'
आई: 'मला अजिबात ऐकायचे नाही. यापुढे तू कॉलेजातून सुटलीस की सरळ घरी यायला हवे, समजलीस?'
मुलगी: 'पण आई, मी आता काही लहान नाही राहिलेली।'
आई : 'म्हणूनच सांगते आहे।'

---

'हे, माझा दोस्त सादिक याचे थडगे आहे. त्या बिचाऱ्याजवळ जे काही होते ते सर्व अनाथ आश्रमाला देऊन टाकले.'
'धन्य आहे तुझा मित्र । त्याने अनाथ आश्रमाला काय-काय दिले?'

### चारोळी

**तू 'तेव्हा' तसा वागलास**
**त्यात तुझा दोष नाही**
**मला 'ते' उशिरा कळलं**
**म्हणूनच काही रोष नाही.**

# कोपरगाव येथे १८ व १९ जुलै रोजी जिल्हास्तरीय योगासन क्रीडा स्पर्धा

नगर – अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्ट असोसिएशनच्या वतीने ७ वी अहिल्यानगर जिल्हास्तरीय योगासन क्रीडा स्पर्धा २०२६–२७ चे आयोजन १८ व १९ जुलै रोजी समता इंटरनॅशनल स्कूल, कोकमठाण, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर येथे सकाळी ८ वाजता करण्यात आले आहे.

१८ जुलै रोजी मुली व महिला गटातील सर्व स्पर्धा प्रकार, तर १९ जुलै रोजी मुले व पुरुष गटातील सर्व स्पर्धा प्रकार पार पडणार आहेत.

स्पर्धेसाठी ऑनलाइन नोंदणीची अंतिम तारीख १६ जुलै असून, प्रत्येक स्पर्धा प्रकारासाठी ₹२०० प्रति खेळाडू इतके प्रवेश शुल्क निश्चित करण्यात आले आहे. स्पर्धा शुल्क स्पर्धेच्या दिवशी स्पर्धास्थळी उपलब्ध असलेल्या QR Code द्वारे ऑनलाइन भरावे. स्पर्धकांनी नाव नोंदणीची पडताळणी व आवश्यक कागदपत्रे जमा करण्यासाठी वेळेत उपस्थित राहावे, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

या स्पर्धा ट्रॅडिशनल योगासन, आर्टिस्टिक योगासन सिंगल, आर्टिस्टिक योगासन पेयर, रीदमिक योगासन पेयर ट्रॅडिशनल ग्रुप आणि आर्टिस्टिक ग्रुप या सहा प्रकारात होणार असून, यामध्ये पुढील प्रमाणे वयोगट असणार आहे.

सब ज्युनिअर ग्रुप (१० ते १४ वर्ष)., ज्युनिअर ग्रुप (१४ ते १८ वर्ष)., सीनियर ग्रुप (१८ ते २८ वर्ष)., सीनियर अ (२५ ते ३५ वर्ष)., सीनियर ब (३५ ते ४५ वर्ष) व सीनियर क (४५ ते ५५ वर्ष)

या जिल्हास्तरीय स्पर्धेतील उत्कृष्ट काम गिरी करणाऱ्या खेळाडूंची आगामी राज्यस्तरीय योगासन क्रीडा स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याच्या संघात निवड करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी जिल्ह्यातील योगासन खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी होऊन राज्यस्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी साधावी, असे आवाहन केले आहे.

स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी उमेश झोटिंग (९८२३१३८८५६), कुलदीप कागडे (९५२७३२०१०९) आणि प्रज्वल ढाकणे (९९२१०९३६५८) यांच्याशी संपर्क साधावा.

# लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरच्या अध्यक्षपदी हरजितसिंह वधवा तर सचिवपदी हरिश हरवानी, खजिनदारपदी विजय कुलकर्णी यांची निवड



नगर – लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, अहिल्यानगरच्या वर्ष २०२६–२७ साठीच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, अध्यक्षपदी हरजितसिंह वधवा, सचिवपदी हरिश हरवानी आणि खजिनदारपदी विजय कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे.

लायन्स क्लब ही २१० हून अधिक देशांमध्ये सुमारे १५ लाख सदस्यांच्या माध्यमातून कार्यरत असलेली जगातील अग्रगण्य सेवाभावी संस्था आहे. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरनेही शहरात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, युवक विकास, नेत्रतपासणी, आपत्ती निवारण तसेच वंचित घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले आहेत.

कोरोना महामारीच्या काळात क्लबने 'घर घर लंगर सेवा' उपक्रमाद्वारे हजारो नागरिकांपर्यंत अन्नसेवा पोहोचवून उल्लेखनीय कार्य केले. तसेच मागील वर्षभरात कन्यादान, महिला सक्षमीकरण, युवतींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण, गरजू मुलींना सायकल वाटप, आरोग्य तपासणी शिबिरे आणि विविध समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. या उत्कृष्ट कार्याची दखल लायन्स इंटरनॅशनलने घेऊन क्लबला विविध पुरस्कारांनी गौरविले आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष हरजितसिंह वधवा हे एम आयडीसीतील उद्योजक असून गेली अनेक वर्षे औद्योगिक क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. ते एच ॲण्ड जे असोसिएट्स या औद्योगिक संस्थेचे प्रमुख असून, गुरू अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून 'घर घर लंगर सेवा', शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि गरजूंसाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आहेत. त्यांनी यापूर्वीही लायन्स क्लबच्या अध्यक्षपदाची यशस्वी धुरा सांभाळली असून, क्लबमधील अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक नाविन्यपूर्ण आणि समाजाभिमुख प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत.

नवनिर्वाचित सचिव हरिश हरवानी हे लायन्स चळवळीतील अनुभवी आणि कार्यक्षम पदाधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी झोन चेअरपर्सन (ZC) तसेच PST म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विविध सामाजिक उपक्रमांचे प्रभावी नियोजन, नेतृत्व आणि उत्कृष्ट जनसंपर्क ही त्यांची विशेष ओळख आहे. ते सिंधी समाज, पंजाबी समाज तसेच भारत भारती ग्रुपशी संलग्न असून अनेक सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी संस्थांमध्ये सक्रिय योगदान देत आहेत.

नवनिर्वाचित खजिनदार विजय कुलकर्णी यांनी बी.एड. महाविद्यालयातून प्रदीर्घ सेवा करून निवृत्ती घेतली आहे. त्यांनी महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे पाच वर्षे अहमदनगर शहराध्यक्ष म्हणून काम पाहिले. तसेच सरस्वती प्राथमिक विद्यामंदिरच्या शालेय व्यवस्थापन समितीवर अनेक वर्षे सदस्य म्हणून कार्य केले आहे. संस्कृत सेवा संघमध्ये सहकार्यवाह म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी वैदिक ज्योतिषाचा सखोल अभ्यास केला असून राष्ट्रीय स्तरावर ज्योतिषाचार्य म्हणून जयपूर आणि पुणे येथे विशेष अतिथी म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. २०१६ मध्ये त्यांनी लायन्स क्लब ऑफ अहमदनगर मिडटाउनचे खजिनदार म्हणून काम पाहिले असून, गेल्या चौदा वर्षांपासून लायन्स क्लबच्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. तसेच अनेक वर्षे कॅबिनेट स्तरावरील विविध पदांची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे सांभाळली आहे.

येत्या कार्यकाळात पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, आरोग्य सेवा, शिक्षण, युवक व महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी आणि गरजू घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार नूतन कार्यकारिणीने व्यक्त केला आहे. लवकरच होणाऱ्या पदग्रहण सोहळ्यात नूतन पदाधिकारी मावळते अध्यक्ष डॉ. संजय आसनानी, सचिव प्रशांत मुनोत आणि खजिनदार दिलीप कुलकर्णी यांच्याकडून पदभार स्वीकारणार आहेत.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला मंजुरी देऊन तातडीने लागू करण्यात यावा अन्यथा १६ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयावर सकल मातंग समाजाचा 'मोर्चा'



अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने तातडीने निर्णय घेऊन तो लागू करावा, अन्यथा १६ जुलै रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सकल मातंग समाज महाराष्ट्रच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आला.

नगर – अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने तातडीने निर्णय घेऊन तो लागू करावा, अन्यथा १६ जुलै रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सकल मातंग समाज महाराष्ट्रच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आला.

पत्रकार परिषदेत सांगण्यात आले की, १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्य सरकारांना असल्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मातंग समाजाला नोकरी, शिक्षण तसेच विविध शासकीय योजनांमध्ये अपेक्षित प्रतिनिधित्व मिळालेले नसल्याने सन १९८० पासून उपवर्गीकरणाची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. सन २०२२ पासून विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष आणि समाजातील मान्यवरांनी एकत्र येत सकल मातंग समाज महाराष्ट्रच्या माध्यमातून हा लढा अधिक व्यापक केला. याअंतर्गत जवाब दो आंदोलन, दवंडी आंदोलन' आणि 'जनआक्रोश महाआंदोलन' यांसारखी आंदोलनेही करण्यात आली. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महाराष्ट्र शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी निवृत्त न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समितीची स्थापना केली होती. समितीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून, इतर राज्यांतील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेचा आढावा घेतला तसेच आवश्यक माहिती व तथ्यांचे संकलन करून मार्च २०२६ मध्ये शासनाला अहवाल सादर केला.

यानंतर शासनाने मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून अहवालावर विविध समाजघटकांकडून सूचना व हरकती मागविल्या. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी शासनाने चालू पावसाळी अधिवेशनात अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा निर्णय घेऊन तो तात्काळ लागू करावा, लाभवंचित समाजघटकांना अतिरिक्त मागासलेपणाचा हक्क द्यावा तसेच आरक्षणातील अनुशेष बॅकलॉक भरून काढावा, अशी मागणी करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा १६ जुलै रोजी अहिल्यानगर शहरातील लहुजी वस्ताद साळवे चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली.

या पत्रकार परिषदेला भारतीय दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुनील उमाप, उद्योगपती विजय वडागळे, श्रीकांत घोरपडे, मनपा पतसंस्थेचे व्हाइस चेअरमन गुलाब गाडे, राम वडागळे, विनोद शिरसाठ, अभिजीत वैराळ, गणेश भालेराव, चंदूभाऊ काळोखे, राहुल भारस्कर, पावलस पवार, पंडित वाघमारे, गणेश घोरपडे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये ११ जुलैला आंतरशालेय योगासन स्पर्धा

नगर – २१ जून हा दिवस संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय संस्कृती व शास्त्रपरंपरेतील योगाचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये योगाची आवड निर्माण व्हावी, तसेच शालेय जीवनातच निरोगी व संतुलित जीवनशैलीची पायाभरणी व्हावी या उद्देशाने कै. विजया (ताई) शिवलकर आंतरशालेय योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे यंदाचे तिसरे वर्ष असून ११ जुलै रोजी ही स्पर्धा पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. शालेय जीवनात विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांची सर्वांगीण जडणघडण होत असते. योगाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास साधण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या माध्यमातून केला जात आहे.

स्पर्धा इयत्ता चौथी ते सहावी आणि इयत्ता सातवी ते नववी अशा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमासाठी 'योग विद्या धाम', अहिल्यानगर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. स्पर्धेचे ठिकाण 'पालवी शिशुविहार', शुभमंगल कार्यालय, भिडे हॉस्पिटलसमोर, सावेडी नाका, अहिल्यानगर असे असून, शहर व परिसरातील शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्पर्धेबाबत अधिक माहिती व नावनोंदणीसाठी ९८९०००१८४० अथवा ९०११५६८५६७ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या दिंडीचे १३ जुलै रोजी नगरमधून प्रस्थान



नगर – येथील वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे १३ जुलै रोजी वैष्णव सेवा भक्त मंडळ पायी दिंडी सोहळा पंढरपूर आषाडी दिंडी साठी प्रस्थान करणार असून दिंडीचे हे १५ वे वर्ष आहे.

ब्रम्हलीन समर्थ सद्गुरु हरिहर महाराज व ब्रम्हलीन शंकर महाराज जोशी, ब्रम्हत्तीन गोपाल चैतन्य महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या वतीने काढण्यात येते. कपिलेश्वर महादेव मंदिर, माळीवाडा, अहिल्यानगर येथून १३ जुलै रोजी दुपारी २ वा.वाजता निघणार आहे.

दिंडी २६ जुलैला पंढरपूरला पोहचणार आहे तर सांगता गुरुपौर्णिमेला २९ जुलैला सुनिल प्रकाश चंद्रभूषण त्रिपाठी यांचे निवासस्थान, भवानीनगर येथे आयोजित केला आहे.

दिंडी सोहळाचा पंढरपूर येथील मुक्काम योग भवन, पंढरपूर येथे राहणार आहे. ज्यांना या दिंडी सोहळ्यात सहभागी व्हायचे त्यांनी व देणगीदारांनी अधिक माहितीसाठी संपर्क दिंडी संयोजक सुनील त्रिपाठी (मा.नगरसेवक) मो.८०५५५४८५५५, ईश्वरसिंग परदेशी मो.७०४०९१५०३३, भगवान मोकाटे मो.९४२३१६२७८२, विनायक खेडकर मो.९२२६२३१९०४, दिनकर घोडके मो. ९४२२२२२२११, सुनील दातरंगे, मो. ९९२१८९९२८२, राजेंद्र फुलारी मो. ७०४०४५७००९, गणेश सुडके, मो.९७६३५२८७९७ यांच्याशी संपर्क साधावा आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे

# 'वारी' ही अंतर्मन जागवणारी यात्रा

## महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन; अर्बन बँक कॉलनीत कन्हेरे – पंढरपूर पायी दिंडीचे स्वागत



अहिल्यानगर शहरात पहिल्याच जळगाव जिल्ह्यातील कन्हेरे ते पंढरपूर पायी दिंडीचे स्वागत अर्बन बँक कॉलनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. (छायाचित्र – विजय मते)

नगर – वारी म्हटलं की डोळ्यासमोर हजारो वारकऱ्यांचे अखंड चालणं उभे राहत, टाळ – मृदुंगांचा नाद आणि विठ्ठल नामाचा गजर होत असतो पंढरीची वारी ही महाराष्ट्राची शेकडो वर्षाची आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा आहे. वारी म्हणजे विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ असते. ही केवळ धार्मिक यात्रा नसते तर वारकऱ्यांना वर्षभर जगवण्याची ऊर्जा, शिस्त आणि जीवन मूल्यांची प्रेरणा देणारा संस्कार असतो. वारी ही अंतर्मन जागवणारी यात्रा आहे. असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील श्रीक्षेत्र कन्हेरे ते पंढरपूर या पायी पहिल्याच दिंडीचे आगमन अहिल्यानगर शहरात अर्बन बँक कॉलनीत झाले. जिव्हाळेश्वर महादेव रथाचे स्वागत महापौर गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिंडी चालक हभप माधव महाराज पाटील, माजी सभापती अभिमान पाटील, भारत बाप्पू, नगरसेवक निखिल वारे, योगीराज गाडे, भैय्या गंधे, माजी नगरसेविका संगीता खरमाळे, मनपाचे शहर अभियंता मनोज पारखे, वैशाली पारखे, संदीप यादव, प्रवीण डोक्रस, राहुल जोशी, अजय घोलप, विनय वाखुरे, सचिन गाडे, शुभांगी निंबाळकर उपस्थित होते.

या पायी दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे हरिहरेश्वर महादेव व विठोबाची भेट या ठिकाणी होते. दिंडी चालक हभप माधव महाराज पाटील यांचा सन्मान आदिनाथ जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अभिजीत जोशी, प्रज्ञा जोशी, भार्गव जोशी उपस्थित होते.

यावेळी दिंडीतील वारकऱ्यांनी भारुडाचा कार्यक्रम सादर केला. हभप अभिजीत जोशी म्हणाले आषाढी वारीही समता, भक्ती व सामाजिक ऐक्याचा उत्सव असतो. परमेश्वरावर अटळ श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाचे प्रतीक म्हणजे ही वारी असते. वारीत कोणी मोठा किंवा लहान नसतो, पैशापेक्षा माणुसकीला जास्त महत्त्व असते.असे श्री. जोशी म्हणाले. यावर्षी २०० ते २५० वारकरी दिंडीत सहभागी झाले होते.

या सर्वांना कॉलनीच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला. जोशी परिवाराच्या वतीने आभार मानण्यात आले.

## जाहीर नोटीस

**तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीबाबत विद्यमान मालक यांनी आमचे आशिलाबरोबर सौदा केलेला असून साठेखत लिहून दिलेले आहे व साठेखतावर विसार रक्कम स्विकारलेली आहे.**

**सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही वाद चालू असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ५ दिवसांते आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**परिशिष्ट मिळकत वर्णन**

**जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| स. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| ७६/३ | १ | ६७४–०० चौ.मी. |

**हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील आर. सी. सी. मधील तळ मजल्याचे बांधकाम क्षेत्र १३९–४० चौ.मी. व पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र ६९–७० चौ.मी. असे एकुण बांधकाम क्षेत्र २०९–१० चौ. मी. बाकी खुली जागा आहे. यातील इले. मीटर कनेक्शन, फिटींग व नळ कनेक्शनसह, अशी संपुर्ण प्लॉटसह बांधकाम मिळकत.**

**यांसी चतु:सिमा:–**

**पुर्वेस– रस्ता व प्लॉट नं.८ दक्षिणेस– स. नं. ७६ पैकी**

**पश्चिमेस– स. नं. ७६ पैकी उत्तरेस – प्लॉट नं. २**

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक**

**सौ. आशा दत्तात्रय आगरकर**

**रा. आशिर्वाद बंगला, आगरकर मळा, स्टेशन रोड अहिल्यानगर ४१४००१**

**ॲड. राजेंद्र पी. शेलोत**

'अर्हम' प्लॉट नं. २६, आदिनाथ कॉलनी

राऊत मळा, अहमदनगर

मो. ९४२२२२३४४१

दि. ९/७/२०२६

# गाई – म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा आणि प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करा

## 'प्राधिकरणा'कडे नोंदणी न करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आयुक्त डॉ. किरण पाटील यांचे निर्देश

नगर – राज्यातील गाई–म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा आणि प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ लागू करण्यात आला आहे. मात्र, अद्याप क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवा पुरवठादार आणि संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांवर अधिनियमाअंतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.

राज्यात या अधिनियमाची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे हा या अधिनियमाचा मुख्य उद्देश आहे. अधिनियमानुसार राज्यातील सर्व कृत्रिम रेतन केंद्रे, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांनी प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून, त्यांना केवळ प्रमाणित आणि उच्च वंशावळीच्या वळूचेच गोठवलेले रेत प्रजननासाठी वापरता येणार आहे.

या प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून, प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती घेणे तसेच नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिनियमानुसार नोंदणी प्रमाणपत्रधारक व्यक्तीने विहित मानकांचे पालन न केल्यास दोष सिद्ध झाल्यावर रु. ५० हजारांपर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्राशिवाय गोजातीय प्रजनन क्रिया करणे, प्रमाणित वळूव्यतिरिक्त इतर वळूंपासून गोठवलेले रेत उत्पादन करणे किंवा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास दोष सिद्ध झाल्यावर रु. १ लाखांपर्यंत दंड आकारला जाईल. तसेच नोंदणी प्रमाणपत्रानुसार मंजूर सेवांबाबत चुकीची किंवा दिशाभूल करणारी जाहिरात अथवा प्रसिद्धी केल्यास दोष सिद्ध झाल्यावर सहा महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा रु. २ लाखांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

शेतकऱ्यांनी केवळ प्रमाणित आणि अधिकृत विर्यमात्रांचाच वापर करावा. सेवा घेण्यापूर्वी संबंधित तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासून नोंदणीकृत तंत्रज्ञांकडूनच सेवा घ्यावी. कोणतीही अनियमितता आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवून पशुधनाचे संरक्षण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सुधारित आणि उच्च उत्पादनक्षम वंशामुळे अधिक दूध उत्पादन, उत्तम प्रजननक्षमतेमुळे जनावरांची संख्या व गुणवत्ता वाढ, वैज्ञानिक आणि नियंत्रित प्रजननामुळे दीर्घकालीन पशुधन विकास तसेच दुग्ध व्यवसायात स्थैर्य आणि आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

आमचे योग गुरुवर्य अनिल मेहेर सर यांना सुरेखा गांधी चा जय जिनेन्द्र ! मी गेल्या दोन वर्षापासून योगाला जाते. एक दीड वर्ष जिजाऊ मध्ये गेले. परंतु दुपारी योगा क्लास असल्यामुळे माझी खूप सुट्टी होत होती. त्यामुळे आनंद योगा सेंटर जॉईन केला.

माझे योगाला येण्याअगोदर टाच व गुडघे खूप दुखत होते. मला टाचेचे ऑपरेशन करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. परंतु योगामुळे माझे ऑपरेशन टळले. व गुडघेही दुखण्याचे कमी झाले. आता माझी फक्त कंबर जास्त दुखत आहे. योगामुळे मला धनुरासन जमायला लागले. पूर्वी मला धनुरासन अजिबात जमत नव्हते.

सर रोज नवीन व्यायामाचे प्रकार घेतात. त्यामुळे आनंद वाटतो व त्यामुळे शरीर हलके व लवचिक होते. त्यामुळे अंगदुखी व पाठदुखी सारखे आजार आपोआप बरे झालेले कळले सुध्दा नाही. योगामुळे गुडघे दुखी पण बरी झाली. माझे योगापूर्वी खूप गुडघे दुखत होते व मला मांडी घालून पण बसता येत नव्हते. एक पाय लांब करुन मला जेवणासाठी बसावे लागत होते. ते आता योगामुळे मांडी घालून बसता येते.

योग करण्यासाठी वयाची मर्यादा नसते असे रोज सर आवर्जून सांगतात. त्यामुळे योग सर्वांनी करणे गरजेचे आहे व निरोगी व आनंद जीवन जगावे. योगामुळे सर्व सण, वाढदिवस, लग्नाची ॲनिव्हर्सरी करतात त्यामुळे खूप आनंद वाटतो. योगामध्ये ट्रीप काढली जाते व त्यामुळे सर्व जण एकत्र येतात व आनंद मिळतो. मेहेर सर खूप खूप माहिती देतात त्यामुळे सरांना खूप खूप धन्यवाद. झुंबा व हास्य यामुळे खूप आनंद वाटतो.



**– सौ. सुरेखा गांधी,**

मोरचूदनगर, केडगाव

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

